- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, २९ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५९ | किंमत : २ रूपये

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# ३२० भारतीय अद्याप बेपत्ता, मृतांची संख्या ६०० वर

**वृत्तसंस्था, काठमांडू**

नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या भीषण महापुरातील मृतांची संख्या शुक्रवारी ६०० वर पोहोचली आहे. अद्याप १,४६८ नागरिक अद्याप बेपत्ता असून त्यांना शोधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, या पुरामुळे नव्याने तयार झालेल्या एका कृत्रिम तलावामुळे पुन्हा एकदा महापूर येण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता नेपाळसह भारताचेदेखील टेन्शन वाढले आहे.

नेपाळ-तिबेट सीमेवर हिमस्खलन झाल्यामुळे चिखल आणि पाण्याचा प्रचंड लोंढा मध्य नेपाळमध्ये धडकला. भोटे कोशी नदीला आलेल्या या महापुरात शहरे आणि गावे जलमय झाली असून अनेक घरे, वाहने, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. रसुवा आणि नुवाकोटमधील अनेक गावे चिखल व ढिगा-याखाली गाडली गेली असून जलविद्युत प्रकल्पांचेही मोठे नुकसान झाले आहे.

रस्ते आणि पूल वाहून गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला असून दुर्गम भागातील लोकांपर्यंत पोहोचण्यात बचाव पथकांना मोठ्या अडचणी येत आहेत. घरे, बाजारपेठा, शेती आणि सरकारी इमारती चिखलाखाली दबल्या गेल्या आहेत. अवघ्या काही मिनिटांत संपूर्ण वस्त्या नामशेष झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. नदीकिनारी आणि दुर्गम भागात बचावकार्य सुरू असतानाच, भोटे कोशी नदीच्या उगमस्थळाजवळ नव्याने तयार झालेल्या तलावामुळे संकट अधिक गडद झाले आहे. हा तलाव फुटल्यास पाण्याचा मोठा लोंढा पुन्हा खाली येऊन परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### ४०० भारतीय सुरक्षित

नेपाळमध्ये आलेल्या भीषण महाप्रलयात आतापर्यंत तब्बल ५७७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती नेपाळ सरकारने आज दिली. तसेच अद्याप एकूण १९०० पेक्षा जास्त लोक बेपत्ता असून, यामध्ये ३२० भारतीयांचा समावेश आहे. मदत व बचाव कार्याद्वारे सध्या शोध मोहीम वेगात सुरू आहे. मात्र, अद्याप त्यांच्याशी संपर्क झालेला नाही. दरम्यान चीनच्या बाजूने तिबेट प्रदेशात असलेल्या ४०० भारतीयांशी संपर्क झाला असून, ते सुरक्षित आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाच्या नियंत्रण कक्षाने ही माहिती दिली. त्यातच चीनमधून १५३ भारतीय नेपाळमध्ये पोहोचल्याचीही माहिती आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी चीनच्या बाजूला आमचे ४०० भारतीय नागरिक आहेत. ते सुरक्षित आहेत. ते त्यांच्या कुटुंबीयांच्या संपर्कात आहेत. आमचा दूतावास त्यांच्यापैकी अनेकांच्या संपर्कात आहे. त्यांच्या अनेक कुटुंबीयांनी बीजिंगमधील आमच्या दूतावासाद्वारे चालवल्या जाणाऱ्या हेल्पलाइन क्रमांकांवरून आमच्याशी संपर्क साधला, असे म्हटले. तसेच चीनमधील आमचा दूतावास स्थानिक अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे आणि तेथे अडकलेल्या या लोकांना कसे बाहेर काढायचे यावर ते काम करत आहेत, असेही ते म्हणाले.



पूरग्रस्त भागातून काल काठमांडूमध्ये आलेले भारतीय नागरिक आज दिल्लीत पोहोचले. यातील २१ भारतीय नागरिक तामिळनाडूचे आहेत. काल आमच्या राजदूतांनी काठमांडूमध्ये त्यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. याशिवाय त्रिशुली वन जलविद्युत प्रकल्पात काम करणाऱ्या ६३ भारतीय नागरिकांविषयीही माहिती दिली. त्यांनाही काल सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

तसेच चीनच्या बाजूला अडकलेले १५३ भारतीय नागरिक रस्तामार्गे सुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले आहेत. त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या भारतीय लोकांशी संपर्क होऊ शकलेला नाही किंवा जे बेपत्ता आहेत, त्यांची संख्या सध्या ३२० आहे, असेही जयस्वाल यांनी सांगितले.

भोटेकोशी नदीला आलेल्या महापुरात शहरे आणि गावे जलमय झाली असून अनेक घरे, वाहने, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. रसुवा आणि नुवाकोटमधील अनेक गावे चिखल व ढिगाऱ्याखाली गाडली गेली असून जलविद्युत प्रकल्पांचेही मोठे नुकसान झाले. रस्ते आणि पूल वाहून गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला असून दुर्गम भागातील लोकांपर्यंत पोहोचण्यात बचाव पथकांना मोठ्या अडचणी येत आहेत. घरे, बाजारपेठा, शेती आणि सरकारी इमारती चिखलाखाली दबल्या गेल्या आहेत. संपूर्ण वस्त्या नामशेष झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### भारताने नेपाळला पाठविली मदत

नेपाळवर ही दुर्घटना घडल्याच्या दिवशीच आम्ही मदतकार्य सुरू केल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. पहिले विमान २६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी रवाना झाले. त्यात तात्पुरती निवारागृहे, ब्लँकेट्स, स्वच्छता किट, सौर दिवे आणि औषधांसह १० टन मदत साहित्य होते. त्यानंतर दुसरे विमान २७ ऑगस्ट रोजी सकाळी रवाना झाले. या विशेष विमानातून तंबू, ब्लँकेट्स, स्वच्छता किट, सौर दिवे, वॉटर पंप, किचन सेट, जनरेटर सेट, औषधे आणि खाद्यपदार्थ आदी साहित्य पाठविले. त्यानंतर आजही एक विमान रवाना झाले.

### बेपत्ता लोकांचा आकडा १९०० वर

नेपाळमध्ये मदत व बचावकार्य वेगात सुरू आहे. परंतु अजूनही ९७७ पेक्षा जास्त लोक बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये ५१७ परदेशी नागरिक, नेपाळी लष्कराचे ४५ जवान आणि नेपाळी पोलिसांचे ४१ जवान यांचा समावेश आहे. तिबेटमध्ये ५५८ लोक बेपत्ता आहेत. ही आकडेवारी सांगितली जात असली तरी बेपत्ता लोकांचा आकडा १९०० वर असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

### आणखी एक तलाव फुटला!

नेपाळ-तिबेट सीमेजवळील आणखी एक तलाव फुटला. चोचेन नदी आणि पुरेपु त्सांगपो नदीच्या संगमाजवळ तयार झालेला हा तलाव आहे. एक दिवसापूर्वीच चीनने तो फुटण्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. तलाव फुटल्यानंतर पाण्याची पातळी वाढू लागली आहे. धोक्यामुळे रसुवा जिल्ह्यातील बचावकार्य ९० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले आहे. भोटेकोशी, त्रिशुली आणि नारायणी नद्यांजवळील अनेक गावे रिकामी केली जात आहेत.

### महाराष्ट्रातील एकूण १०६ पर्यटक परतले

नेपाळला महाप्रलयाचा तडाखा बसल्याने महाराष्ट्रातील अनेक पर्यटक तेथे अडकले होते. त्यापैकी १०६ जण शुक्रवारी बिहारमधील सीतामढी येथे पोहोचले. महाराष्ट्र सरकारने याबाबत बिहार सरकारशी संपर्क साधून माहिती दिली होती. त्यानुसार सीतामढी जिल्हा प्रशासनाने मदतकार्य सुरू करून सीतामढीत आणले आहे. दरम्यान, आणखी ८४ पर्यटक सुखरूप पोहोचणार असल्याचे सांगण्यात आले.

---

थोडक्यात

## दिल्लीतील जोडप्याची पाकसाठी हेरगिरी

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित हेरगिरी नेटवर्कचा पदार्फाश केला आहे. पोलिसांनी हेरगिरीच्या आरोपाखाली दिल्लीतील साहिल (२५) आणि त्याची पत्नी समीरा (२१) या जोडप्याला अटक केली आहे. पोलिसांनुसार, दोघे २०२४ पासून पाकिस्तानात बसलेल्या गुप्तचर अधिका-यांच्या संपर्कात होते. ते भारताशी संबंधित संवेदनशील माहिती गोळा करणे, ८ भारतीय सिम कार्ड पाकिस्तानात पाठवणे आणि इतर लोकांना हेरगिरीसाठी तयार करण्यात मदत करत होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, तपासात या नेटवर्कचे धागेदोरे दिल्लीपासून कराची आणि इस्लामाबादपर्यंत जोडलेले आढळले आहेत. पाकिस्तानात बसलेले हँडलर दोघांना पैसेही पाठवत होते.

पोलिसांनुसार, साहिल आणि समीराने २०२४ ते २०२५ दरम्यान ५ भारतीय सिम कार्ड मिळवले. हे सिम कार्ड दुबईमार्गे पाकिस्तानात पाठवण्यात आले. हँडलरने यासाठी दाम्पत्याला ३० हजार रुपये दिले होते. पोलिसांनी सांगितले की, या नंबरवरून पाकिस्तानात व्हॉट्सअॅप अकाउंट ॲक्टिव्हेट करण्यात आले. पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांनी या अकाउंट्सद्वारे भारतातील लोकांशी संपर्क साधला आणि संवेदनशील माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला.

यापैकी काही खात्यांद्वारे भारतीय व्हॉट्सअॅप ग्रुपमध्येही प्रवेश करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलिसांनुसार, पाकिस्तानात बसलेले हँडलर सोशल मीडिया आणि एन्क्रिप्टेड कम्युनिकेशन प्लॅटफॉर्मद्वारे भारतातील लोकांशी संपर्क साधत होते.

---

## सोनिया गांधी यांचे पुस्तक छापण्यास प्रकाशकाचा नकार

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

पेंग्विन रँडम हाऊस इंडिया कॉंग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचे 'बिलॉन्गिंगः अ जर्नी ऑफ लव' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक भारतात प्रकाशित करणार नाही. एक्स्प्रेसनुसार, पीआरएचआयने पुस्तकाच्या एका भागात काही संपादकीय बदल आणि काही भाग वगळण्याची मागणी केली होती. परंतु लेखकांनी ही मागणी फेटाळून लावली.

पेंग्विन इंडिया या प्रकल्पातून बाहेर पडल्यानंतर, हार्पर कॉलिन्सला भारतात या




पुस्तकाच्या प्रकाशनाचे काम मिळू शकते. यापूर्वी हे पुस्तक १० नोव्हेंबर रोजी प्रकाशित होणार होते. या पुस्तकात सोनिया गांधी राजकारणातील त्यांचा प्रवास आणि २००४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारण्याच्या त्यांच्या निर्णयाशी संबंधित अनुभव सांगतील.

यात नेहरू-गांधी कुटुंबातील विवाह आणि कुटुंबात झालेल्या हत्यांनंतर बदललेल्या आयुष्याबद्दल लिहिले आहे. आधी पुस्तकाचे अमेरिकन प्रकाशक नॉफ यांनी सांगितले होते की, पुस्तकाची पहिली प्रिंट रन १ लाख प्रतींची असेल. द इंडियन एक्सप्रेसने नॉफ आणि सोनिया गांधींचे एजंट डेव्हिड गॉडविन यांना प्रश्न पाठवून प्रतिक्रिया मागितली, परंतु दोघांनीही टिप्पणी दिली नाही. पेंग्विन रँडम हाऊस इंडियाचे सीईओ गौरव श्रीनागेश यांना सोनिया गांधींच्या हस्तलिखितामध्ये मागितलेल्या बदल आणि भाग काढण्याबद्दल विचारण्यात आले होते. तेही टिप्पणीसाठी उपलब्ध नव्हते.

### कुटुंबावर खूप काही लिहिले गेले आहे

सोनिया गांधी यांनी यापूर्वी इतर पुस्तके लिहिली आणि संपादित केली आहेत. मात्र, या पुस्तकावर काम केलेल्या लोकांच्या मते, हे त्यांच्या आयुष्यातील सर्वात वैयक्तिक आणि सर्वात विस्तृत वर्णन आहे. नॉफच्या प्रकाशनात सोनिया गांधींचे निवेदनही छापण्यात आले होते.

---

## पाकमध्ये २०० वर्षांपूर्वीचा गुरुद्वारा पाडला

**क्वेटा :** पाकिस्तानमधील बलुचिस्तानची राजधानी क्वेटा येथे सुमारे २०० वर्षे जुना ऐतिहासिक श्री गुरु सिंह सभा गुरुद्वारा पाडण्यात आला. आता या जागेवर एक मॉल बांधले जात आहे. बलुचिस्तान गुरुद्वारा सिंह सभेचे सदस्य सरदार जसबीर सिंह यांच्या मते, संपूर्ण शीख समाज याचा विरोध करत आहे, परंतु अद्याप सरकारने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यांनी सांगितले की बलुचिस्तानमध्ये एकेकाळी १२ गुरुद्वारे होते, त्यापैकी आता फक्त २ शिल्लक आहेत.

गुरुद्वारा पाडल्याबद्दल भारतातही तीव्र विरोध होत आहे. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आरपी सिंह यांनी सांगितले की, हा पाकिस्तानातील शिखांचा वारसा संपवण्याचा प्रयत्न आहे. अकाल तख्त साहिबने पाकिस्तान सरकारसमोर हा मुद्दा उपस्थित करावा आणि स्वतंत्र चौकशी व्हावी. क्वेटा येथील आर्चर रोडवरील श्री गुरु सिंह सभा गुरुद्वारा परिसरात नंतर सेंट गॅब्रिएल शाळा चालवली जात होती. शीख समुदायाचे नेते सरदार जसबीर सिंह यांच्या मते, आता त्याच गुरुद्वाराला पाडून येथे शॉपिंग प्लाझाचे बांधकाम केले जात आहे. हे प्रकरण बलुचिस्तान उच्च न्यायालयात पोहोचले, परंतु न्यायालयाने सध्या बांधकाम थांबवण्यास नकार दिला आहे.

---

## 'ई १०' पुन्हा येणार नाही

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

देशात एप्रिलपासून २० टक्के इथेनॉल मिश्रण असलेले ई २० पेट्रोल लागू झाल्यानंतर या इंधनाबाबत सातत्याने विविध चर्चा आणि वाद सुरू आहेत. यातच आता जुन्या वाहनांचे नुकसान टाळण्यासाठी बाजारात पुन्हा जुने ई १० पेट्रोल आणले जाणार असल्याची जोरदार चर्चा रंगली होती. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजय खन्ना यांच्या एका वक्तव्यानंतर या चर्चेला उधाण आले होते. मात्र, आता बीपीसीएल आणि केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने यावर स्पष्टीकरण देत ई २० पेट्रोल मागे घेण्याचा किंवा ते बदलण्याचा




कोणताही प्रस्ताव नसल्याचे स्पष्ट केले आहे.

२७ ऑगस्ट रोजी बीपीसीएलच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर पत्रकारांशी बोलताना संजय खन्ना यांनी जुन्या वाहनांसाठी कमी इथेनॉल ब्लेंडिंग असलेल्या इंधनाचा पर्याय देण्याच्या शक्यतेवर भाष्य केले होते. कंपनी याच्या विविध ऑपरेशनल बाजू तपासून पाहत असून अजून काहीही निश्चित झालेले नाही, असे ते म्हणाले होते. या वक्तव्यानंतर बाजारात ई २० ऐवजी पुन्हा ई १० पेट्रोल येणार असल्याच्या बातम्या वेगाने पसरल्या. यावर पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले की, सरकारच्या पातळीवर ई २० बदलून ई १० आणण्याबाबत कोणतीही चर्चा सुरू नाही.

### बीपीसीएलने दिली अधिकृत सफाई

वाढत्या चर्चांनंतर बीपीसीएलने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर स्पष्टीकरण जारी करत म्हटले की, संजय खन्ना यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढला गेला आहे. संजय खन्ना यांनीही स्पष्ट केले की, ई २० पेट्रोल पूर्णपणे ई १० ने बदलले जाईल, असे वक्तव्य त्यांनी कधीही केलेले नाही.

### जुन्या वाहनधारकांना ई २० ची चिंता का?

इंजिनची सुसंगतता : एप्रिल २०२३ नंतर उत्पादित झालेली वाहने ही ई २० सुसंगत आहेत. मात्र, त्यापूर्वीच्या जुन्या गाड्या या ई १० इंधनासाठी डिझाइन करण्यात आल्या होत्या.

### पार्ट्स खराब होण्याची भीती

ई २० पेट्रोलमधील इथेनॉलचे जास्त प्रमाण जुन्या वाहनांमधील रबर, प्लास्टिकचे होजेस आणि फ्युएल लाईन्स खराब करू शकते.

### मायलेजमध्ये घट

ई २० मुळे जुन्या वाहनांच्या मायलेजमध्ये काही टक्क्यांची घट होत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञ आणि सरकारनेही नोंदवले आहे. या सर्व चिंतांमुळे जुन्या वाहनांसाठी वेगळा पेट्रोल पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने होत असली, तरी सध्या देशात केवळ ई २० पेट्रोलचे धोरणच पुढे नेले जाणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

---

## भाजपने निवडणूक हायजॅक केली : बॅनर्जी

**वृत्तसंस्था, कोलकाता**

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शुक्रवारी सांगितले की, भाजपने निवडणुका हायजॅक करण्यासाठी निवडणूक आयोगाचा वापर केला. मतदार यादीतून लाखो नावे बेकायदेशीरपणे काढून मत लुटण्यासाठी एसआयआरचा वापर करण्यात आला. ममता पुढे म्हणाल्या भाजप बंगालमध्ये फूट पाडणारे राजकारण करत आहे आणि भीती पसरवण्यासाठी पोलिसांचा वापर करत आहे.

आज तृणमूल छात्र परिषदेचा स्थापना दिवस आहे. ममता यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी कोलकाता येथे एका



कार्यक्रमात विद्यार्थ्यांना संबोधित केले. टीएमसीच्या राजवटीत पोलिसांचा चेहरा मानवी होता, पण भाजपने पोलिसांना राक्षसी संस्थेत बदलले. ममता म्हणाल्या की त्या आपल्या समर्थकांविरुद्ध पोलिसांच्या अत्याचारांना थांबवतील. त्यांनी सांगितले की हा रक्षाबंधनाचा त्यांचा संकल्प आहे.

ममतांनी भाजपवर बंगालमध्ये विभाजनकारी राजकारण करण्याचा आणि पोलिसांच्या माध्यमातून लोकांमध्ये भीती पसरवण्याचा आरोप केला. त्या म्हणाल्या की त्या लवकरच संपूर्ण राज्याचा दौरा सुरू करतील आणि जर त्यांच्या सभांना परवानगी मिळाली नाही, तर त्या रस्त्यावर उतरून लोकांमध्ये जातील. मी बघेन की त्यांच्याकडे किती अंडी आणि विटा जमा आहेत. फुटपाथवरून फेरीवाल्यांना हटवण्यावर त्यांना आक्षेप नाही, पण त्यांना दुसरी जागा दिली पाहिजे. जर सरकार असे करू शकत नसेल, तर त्यांना दरमहा २५ हजार रुपये नुकसान भरपाई दिली पाहिजे.

संपादकीय लेखणीतून...

# संतशिरोमणी दंडवते महाराज

भगवंत जन्म व बालपण, साधुंचे रक्षण, दुष्टांचे पारिपत्य व धर्म संस्थापनेसाठी वारंवार अवतार घेतो. श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी याच कार्यार्थ अवतार धारण केला. कायार्चा भार श्री स्वामी समर्थ व माणिकप्रभूंनी समर्थपणे सांभाळला. याच अवतार परंपरेत माघ वद्य २ इ.स. १९०७ गुरुवारी महाराजांचा जन्म श्री नृसिंहसरस्वतींची लिलाभूमी गाणगापूर येथे झाला.

हैद्राबाद निवासी एक सत्शील दत्तभक्त दांपत्य सीतामाई व रामराव यांनी सिध्दस्थान गाणगापूरात अत्यंत खडतर व कठीण साधना व सेवा केली. इच्छा फक्त एकच पोटी संतान नव्हते त्यामुळे ते दोघेही दुःखी होते. भिमा अमरजा संगमावर श्री रामराव गुरुचरित्र पठणाची सेवा करीत तर सीतामाई सिद्ध कल्पवृक्ष औदूंबरास मध्यान्हीपर्यंत प्रदक्षिणा घालीत. माध्यान्हकाळी रामराव संगमापासून श्री गुरुंच्या निर्गुण मठापर्यंत दंडवत घालीत जात असत. नंतर माधुकरी मागून दत्तप्रसादाचे सेवन करून मठस्थानी असलेल्या अश्वस्थ वृक्षास प्रदक्षिणा घालून सायंकाळी श्रींची पालखी सेवा आटपून पुन्हा संगमस्थानी जात असत अशी खडतर सेवा त्यांनी १२ वर्षे केली. जणु श्रीचरणी या दांपत्याने साकडे घातले. स्वामी महाराज भक्त प्रतिपालक मग ते शांत कसे राहणार? एका शुभदिनी सितामाई सेवेत असताना श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज प्रकट झाले व म्हणाले "माते मजसमान एक दिव्य बालक तुज्या पोटी जन्माला येईल. माते तू वांझ नाहीस" आणि उजव्या हातावर दोन खारकांचा प्रसाद दिला व श्रीगुरु अदृष्य झाले. सितामाई भानावर आल्यावर काय? उजव्या हातात खरोखरच २ खारका होत्या. त्या साध्वीने सदर घटना आपल्या पतीच्या कानी घातली. दोघांनाही आपल्या सेवेची कृतकृत्यता वाटली. दुपारी निर्गुण मठी दर्शनास गेल्यानंतर तो प्रसाद निर्गुण पादूकांना स्पर्श करून सितामाईनी भक्षण केला त्यावेळी रामरावांचे वय होते ६२ व सितामाईचे ५९ पण तो प्रसाद भक्तकाम कल्पद्रुम स्वामींचा होता, तो व्यर्थ कसा होणार? यथावकाश सीतामाईंनी माघ व.२ गुरुवार दि.३१ जानेवारी १९०७ रोजी सायंकाळी एका दिव्य बालकाला जन्म दिला. माता पित्यांना तो दिव्य प्रसाद पाहून अत्यंत आनंद झाला. वयाच्या ५९ व्या वर्षी विटाळ नाही अशा पवित्र अवस्थेत पुत्ररुपी प्रसाद ! गाणगापुरी मिळालेला हा कृपाप्रसाद म्हणून त्या दिव्य बालकांचे नाव 'गुरुनाथ' असे ठेवण्यात आले.

गुरु अनुग्रहः हैद्राबादेतील सिध्दपुरुष श्री बाळकृष्णानंद पांडुरंगभक्त यांचेकडे या दांपत्याचे जाणे येणे असे. त्यांचेकडे सुर्योदयाच्या वेळी द्वादशीस अन्न संतर्पण असे. त्याठिकाणी दंडवत घालीत जाण्याचा नियम गुरुनाथांनी केला. त्याठिकाणी ते पंगत वाढणे पत्रावळी उचलणे अन्य सेवाही केल्या. त्याकडे पाहून बाळकृष्णानंद प्रसन्न झाले. एका प्रसन्न क्षणी ते म्हणाले, "माझ्या मनात देवी गायत्रीची अनुष्ठाने करण्याची तिव्र इच्छा होती ती आता गुरुनाथ पूर्ण करेल." वयाच्या २४ व्या वर्षी त्यांना बाळकृष्णानंद म्हणजेच बापूराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. मरणोत्तर अवस्थेतही ते गुरुनाथांना शोधत होते. त्यांनी आपली नजर गुरुनाथांवर स्थिरावली व बापूरावांच्या मुखातून एक दिव्य ज्योत निघून गुरुनाथांचे मुखात प्रवेश करती झाली व बाळकृष्णानंदांचा आत्मा अनंतात विलीन झाला.

गुरुनाथा बाबा हे मातृभक्त होते. ते आईचे आज्ञेशिवाय कोठलेही कार्य करीत नसत. आईच्या हातचा प्रसादच ते अनुष्ठान काळात घेत असत. स्वतःच्या लग्नातदेखील त्यांनी आईच्या हातच्या स्वयंपाकाचेच भक्षण केले. रोज आईवडिलांचे चरणतीर्थ ते प्राशन करीत. एकदा असा प्रसंग आला की आईला पायाला जखम झाली व डॉक्टरांनी पाय कापून टाकण्याचा सल्ला दिला पण पाय कापला तर चरणतिर्थ कसे घेणार? त्यांनी आपल्या गुरुंना स्मरून पाय न कापण्याचा सल्ला दिला व १३ व्या दिवशी एक चमत्कार घडला. मातोश्रींचा पाय पूर्णपणे बरा झाला. डॉक्टरही चक्रावले. वयाच्या ३१ व्या वर्षी मातृइच्छा पूर्ण करण्यासाठी हैद्राबाद ते पंढरपूर त्यांना कावडीत बसवून प्रवास पायी केला. गुरुनाथांचे कॉलेजचे शिक्षण चालू असतानाच त्यांचा विवाह गाणगापूर येथील चौडापूर येथील संस्कारसंपन्न व सुस्वरूप पद्मावतीशी सन १९२२ मध्ये झाला. भाद्रपद व. ७ शके १८५२ गुरुनाथांना पुत्ररत्न प्राप्त झाले तेच व्यंकटेश उर्फ प्रभू. आजोबा आजीच्या आनंदाला पारावार उरला नाही. वयाच्या २६ व्या वर्षी त्यांचे पितृरत्न हरपले. गुरुनाथांनी मातेचे सांत्वन तर केलेच पण त्यांची खूप सेवा केली. त्यांची सुशीला नावाची मुलगी १२ व्या वर्षी मृत झाली नंतर झालेल्या दोन्हीही मुली अल्पायुषी ठरल्या. अशा अनेक संकटातही त्यांनी बापूराजांनी समाधीची दंडवत सेवा चालूच ठेवली. त्यातच पद्मावती आईसाहेब वयाच्या ३१ च्या वर्षी सोडून गेल्या. त्यावेळी सीताआई खूपच थकलेल्या होत्या. त्यांनाही हे दुःख सहन झाले नाही. मातोश्रींचे इच्छेखातर लक्ष्मीबाईंशी त्यांचा दुसरा विवाह वयाच्या ३२ व्या वर्षी संपन्न झाला. मुलगा मुलगी झाली पण ती दोन्हीही अपत्ये अल्पायुषी ठरली. दुसरी पत्नीही वयाच्या ४६ व्या वर्षी स्वर्गवासी झाली.

उपासना व अनुष्ठानेः गुरुनाथांनी हैद्राबादचे संस्थानिक राजे शामराज बहादूर यांचेकडे १७ वर्षे व ५ दिवस मानाची नोकरी केली. ते तसे विरक्त पण या समस्यांनी अधिकच विरक्त झाले. त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व सद्गुरु बापू राजांनी १६व्या वर्षी दिलेल्या गायत्री अनुष्ठानाचा विचार घोळू लागला. एक पूरश्चरण म्हणजे २४ लाख जप. अनुष्ठान काळात आंतरिक तसेच बाह्य विचार आचार नेम व निष्ठा निर्मळ असावी. त्यांनी १११ श्री सत्यनारायण पूजा, १०८ वेळा भागवत सप्ताहात वाचन करून बापूराजच्या समाधीचे दर्शन करून गायत्री पूरश्चरणास प्रारंभ केला. एका अनुष्ठानास ६ ते १० महिने कालावधी लागे, पहाटे ५.३० वाजल्यापासून अनुष्ठान, माध्यान्ह स्नान, गुरुचरित्र वाचन, गोसेवा, प्रसाद व रात्रीचे चक्री भजन असा कार्यक्रम असे. प्रत्येक अनुष्ठानानंतर ते गायत्री यज्ञ करीत असत. सलग २४ अनुष्ठाने पूर्ण झाल्यावर श्री समर्थ रामदासांनी त्यांनी राहिलेली १२ गायत्री अनुष्ठाने पूर्ण करण्यास सांगितले. आयुष्यात १०० गायत्री पुरश्चरणे व १०० गायत्री यज्ञ त्यांनी केले. नदीत समुद्रात तसेच काही तिर्थक्षेत्री त्यांनी ही अनुष्ठाने व यज्ञ केले.

# ब्रिक्सच्या छायेत 'कॉकरोच' आंदोलनाचा एल्गार

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

नवी दिल्लीत आगामी सप्टेंबर महिन्यात ब्रिक्स संमेलन आयोजित होणार आहे. ब्रिक्स संमेलनाच्या पार्श्वभूमीवरच भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलीन करण्याच्या दृष्टीने काक्रोच जनता पार्टी व या पाटीर्ला छुपे समर्थन देणाऱ्या एनडीए सरकार विरोधी पक्षांनी सरकारला अस्थिर करण्यासाठी वातावरण तयार करण्यासाठी 'कॉकरोच जनता पार्टी'ने ५ सप्टेंबर २०२६ रोजी पुन्हा एकदा दिल्लीच्या रस्त्यांवर शांततापूर्ण आंदोलन आणि मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. कॉकरोच जनता पार्टी' या तरुण-नेतृत्वाखालील आंदोलनाने आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आणि ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर आपले लक्ष केंद्रित केले आहे.आता हे आंदोलन आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा व्हावी म्हणून ब्रिक्स संमेलनाच्या छायेत आपल्या मागण्या व मोहिम अधिक तीव्र करत आहे.

नवी दिल्ली येथे सप्टेंबर २०२६ मध्ये आयोजित होणारी ११८ वी ब्रिक्स शिखर परिषद भारताच्या राजनैतिक आणि जागतिक भूमिकेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.या संमेलनाचे प्रमुख महत्त्व खालील मुद्द्यांवरून स्पष्ट होते.भारत या परिषदेचे अध्यक्षपद भूषवत असून, विकसनशील देशांच्या समूहाचा आवाज जागतिक स्तरावर मजबूत करण्यासाठी हे संमेलन महत्त्वाचे आहे. वाढत्या जागतिक राजकीय तणावाच्या काळात (जसे की पश्चिम आशियातील संघर्ष), विविध प्रमुख जागतिक नेत्यांना एकाच मंचावर आणून धोरणात्मक संतुलन साधण्याची भारताची ही एक मोठी संधी आहे. आंतर-ब्रिक्स व्यापार वाढवणे, लवचिक पुरवठा साखळी मजबूत करणे आणि डिजिटल व ई-कॉमर्सच्या माध्यमातून आर्थिक लवचिकता बळकट करणे यावर चर्चा होईल. रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चिनी राष्ट्रपती शी जिनपिंग यांसारखे जागतिक नेते नवी दिल्लीत एकत्र येणार असल्याने भारताच्या द्विपक्षीय संबंधांवर आणि राजनैतिक भूमिकेवर संपूर्ण जगाचे लक्ष असणार आहे. जागतिक आर्थिक आव्हानांना तोंड देणे आणि जागतिक राजकारणात सहकार्य वाढवणे हा या परिषदेचा मूळ उद्देश आहे.

जागतिक स्तरावर देशाचे लक्ष वेधण्यासाठी या आंदोलनाने आता ब्रिक्स संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आपल्या निदर्शनांची व रणनीतीची दिशा ठरवली आहे.अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील या सोशल मीडिया चळवळीने केंद्र सरकारवर 'वादाखिलाफी'चा (दिलेला शब्द न पाळल्याचा) आरोप केला आहे. जुलै २०२६ मध्ये जंतर-मंतर येथे झालेल्या मोठ्या आंदोलनानंतर सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण न केल्यामुळे हा मोर्चा काढण्यात येत असल्याचे पक्षाने म्हटले आहे.

२५ जुलै रोजी विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेताना सरकारने आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे आणि स्पर्धा परीक्षांमध्ये सुधारणा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, महिना उलटूनही त्यावर ठोस कारवाई झाली नसल्याचा सी जे पी चा दावा आहे.

हा मोर्चा प्रामुख्याने नीट परीक्षा घोटाळा आणि कथित पोलीस लाठीचार्जमधील पीडित तरुण आणि त्यांच्या कुटुंबियांच्या नेतृत्वाखाली काढला जाईल.५ सप्टेंबर रोजी (शिक्षक दिनी) हा मोर्चा इंडिया गेटपासून सुरू होऊन नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत जाणार आहे.

काक्रोज जनता पार्टीने आपल्या न्याय मागण्यांसाठी मोर्चा काढावा मोर्चाला विरोध होण्याचे कोणतेही कारण नाही मात्र मोर्चा अशावेळी आयोजित केला की ज्यावेळी दिल्लीत ब्रिक्स संमेलन होणार आहे.

सप्टेंबर २०२६ मध्ये नवी दिल्लीत १८ वे ब्रिक्स शिखर संमेलन आयोजित केले जाणार आहे, ज्यामध्ये रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासह जागतिक नेते सहभागी होण्याची शक्यता आहे. या व्हीव्हीआयपी मुव्हमेंटच्या काळात दिल्लीत सुरक्षा व्यवस्था कडक असते.

ब्रिक्स संमेलनाच्या अगदी आधी असा मोर्चा काढून देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिमा खराब करण्याचा आणि दिल्लीतील कायदा-सुव्यवस्था बिघडवण्याचा हा प्रयत्न आहे.

भारत सरकार नवी दिल्लीत जागतिक नेत्यांच्या उपस्थितीत 'ब्रिक्स शिखर परिषद' आयोजित करत आहे. याच काळात आंतरराष्ट्रीय मीडियाचे लक्ष भारताकडे असताना, तरुणांच्या मागण्या जगासमोर मांडण्यासाठी सीजेपीने ५ सप्टेंबर रोजी इंडिया गेट ते दिल्ली पोलीस मुख्यालय असा भव्य मोर्चा काढण्याचे ठरवले आहे.

- ९५६१५९४३०६

# सोनल दिनुशामुळे भारताच्या डब्ल्यूटीसी अभियानाला हादरा

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

सोनल दिनुशाच्या दोन्ही डावातील शतकांच्या जोरावर श्रीलंकेने कोलंबो कसोटी सामना अनिर्णित राखला. अंतिम दिवशी, भारताला श्रीलंकेच्या चार विकेट्सची गरज होती आणि श्रीलंकेकडे केवळ १६ धावांची आघाडी होती. सामन्यावर भारताची पकड मजबूत दिसत होती आणि विजय निश्चित वाटत होता. मात्र, दिनुशा आणि केशरा नुवान्थाने पहिल्या सत्रात भारतासाठी अडचणी निर्माण केल्या आणि दिनुशाच्या शतकाने श्रीलंकेच्या आशा पल्लवित केल्या. पहिल्या डावात शतक झळकावणाऱ्या दिनुशाने दुसऱ्या डावातही शतक झळकावून भारताच्या सामना जिंकण्याच्या आशा पूर्णपणे संपुष्टात आणल्या.

दिनुशा आणि नुवान्था या दोघांनीही पहिल्या सत्रात आपली पकड घट्ट ठेवली आणि भारतीय गोलंदाजांना एकही विकेट घेऊ दिली नाही. पुढच्या सत्रात भारताने नुवान्था आणि प्रभात जयसूर्या यांच्या विकेट्स घेतल्या असल्या तरी, श्रीलंकेने केवळ ५४ धावा करून भारताला आणखी विकेट्स घेऊ दिल्या नाहीत.

अंतिम सत्रात दिनुशाने आपले शतक पूर्ण केले आणि फॉलो-ऑन खेळताना कसोटी सामन्याच्या दोन्ही डावांमध्ये शतके झळकावणारा तो केवळ तिसरा फलंदाज ठरला. दिनुशाच्या आधी केवळ विजय हजारे आणि अँडी फ्लॉवर यांनीच हा पराक्रम केला होता.

तिसऱ्या सत्रात श्रीलंकेला मोठा धक्का बसला, जेव्हा रवींद्र जडेजाच्या गोलंदाजीवर यशस्वी जयस्वालने शॉर्ट लेगला एक अप्रतिम झेप घेत झेल पकडून लाहिरू कुमाराला बाद केले. तथापि, शेवटच्या विकेटसाठी फलंदाजीला आलेल्या असिथा फर्नांडोने दिनुशाला साथ दिली आणि श्रीलंकेने आपली आघाडी २०० धावांच्या पुढे नेली.

त्यानंतर, श्रीलंकेला सर्वबाद करूनही, भारतासाठी लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करणे अधिकाधिक कठीण वाटू लागले. जसजसा वेळ जात होता, तसतशी दिवसाच्या खेळातील उर्वरित षटके हळूहळू कमी होत गेली. श्रीलंकेची आघाडी २१६ धावांवर असताना, दोन्ही संघांनी हस्तांदोलन करण्याचा निर्णय घेतला आणि सामना अनिर्णित राहिला. तथापि, भारताने ही मालिका १-० ने जिंकली.

कोलंबो एसएससी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने सामना अनिर्णित राखला असून, भारताने १-० ने विजय मिळवत मालिका जिंकली आहे. जागतिक विश्वचषक स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) चौथ्या पवार्चा तिसरा टप्पा सुरू होत असताना, पात्रता फेरीत बांगलादेशचा ऑस्ट्रेलियातील १-१ असा सामना आणि भारताचा श्रीलंकेतील १-० असा विजय यांची मोठी भूमिका राहिली आहे. मागील पर्वात दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया अनुक्रमे ६९.४४% आणि ६७.५४% मतांसह अंतिम फेरीसाठी पात्र ठरले होते, तर २०२३ च्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलिया आणि भारत अनुक्रमे ६६.६७% आणि ५८.८०% मतांसह पात्र ठरले होते.



### गुणतालिकेतील प्रत्येक संघांची कामगिरी

ऑस्ट्रेलियाः १० सामन्यांपैकी ८ सामने जिंकून आणि २ गमावून, ९६ गुणांसह ८०.००% टक्केवारी (पीसीटी) मिळवत गुणतालिकेत पहिल्या स्थानी आहे.

दक्षिण आफ्रिकाः ४ सामन्यांपैकी ३ विजयांसह आणि १ पराभवासह, ३६ गुणांच्या जोरावर ७५.००% मिळवून दुसऱ्या स्थानी आहे.

न्यूझीलंडः ६ सामन्यांपैकी ४ जिंकले, १ हरले आणि १ अनिर्णित राहिला; ५२ गुणांसह ७२.२२% मिळवून संघ तिसऱ्या स्थानी आहे.

बांगलादेशः ६ पैकी ३ विजय, २ पराभव आणि १ अनिर्णित सामन्यासह ४० गुण मिळवून ५५.५६% सह चौथ्या स्थानी आहे.

भारतः ११ सामने खेळून ५ विजय, ४ पराभव आणि २ अनिर्णित निकालांसह ६८ गुण आणि ५१.५२% सह पाचव्या स्थानी आहे.

श्रीलंकाः ६ सामन्यांत १ विजय, २ पराभव आणि ३ अनिर्णित सामन्यांमधून २४ गुणांसह ३३.३३% मिळवून सहाव्या स्थानी आहे.

इंग्लंडः १४ सामन्यांपैकी ५ जिंकले, ८ पराभव पत्करले आणि १ अनिर्णित राहिला; ५० गुणांसह २९.७६% मिळवत संघ सातव्या स्थानी आहे.

वेस्ट इंडिजः १२ सामन्यांपैकी २ विजय, ८ पराभव आणि २ अनिर्णित निकालांसह ३० गुण मिळवून २०.८३% सह आठव्या स्थानी आहे.

पाकिस्तानः ७ सामन्यांपैकी २ विजय आणि ५ पराभवांसह, १६ गुणांच्या आधारे १९.०५% मिळवून गुणतालिकेत तळाशी (नवव्या स्थानी) आहे. पुढील फेरीत जाण्यासाठी स्पर्धेत असलेल्या प्रत्येक संघाला काय करणे आवश्यक आहे, ते येथे दिले आहे.

### ऑस्ट्रेलिया -

दक्षिण आफ्रिका दौरा (परदेशात मालिका) - (३ कसोटी सामने), न्यूझीलंड विरुद्ध (मायदेशात मालिका) - (४ कसोटी सामने), भारत दौरा - (परदेशात मालिका) - (५ कसोटी)

डार्विनमध्ये बांगलादेशविरुद्ध पराभव होऊनही, ऑस्ट्रेलिया संघ दहा सामन्यांमधून आठ विजय आणि दोन पराभवांसह ८०% टक्केवारीसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. पात्र ठरण्यासाठी ते सर्वोत्तम स्थितीत असलेला संघ आहे आणि या चक्रात त्यांचे १२ कसोटी सामने शिल्लक आहेत, त्यापैकी आठ सामने दक्षिण आफ्रिका आणि भारतात खेळले जातील. सहा विजय आणि एक बरोबरी त्यांना ६५% चा टप्पा ओलांडायला लावेल, तर सात विजय आणि एक बरोबरी त्यांना ७०% च्या जवळ पोहोचवेल, ज्यामुळे मागील दोन स्पर्धा चक्रांचा निकाल पाहता, अव्वल दोन स्थानांपैकी एक निश्चितपणे निश्चित होईल.

### दक्षिण आफ्रिका

उरलेल्या मालिकाः ऑस्ट्रेलिया (३ कसोटी, मायदेशी); बांगलादेश (२ कसोटी, मायदेशी); इंग्लंड (३ कसोटी, मायदेशी); श्रीलंका (२ कसोटी, परदेशात)

दक्षिण आफ्रिकेसाठी परदेशातील मालिकांचे चक्र कठीण आहे, कारण त्यांच्या सर्व परदेशातील मालिका आशियामध्ये आहेत; त्यांनी चारपैकी तीन कसोटी जिंकून चांगली कामगिरी केली आहे आणि श्रीलंकेत एक मालिका अजून खेळायची बाकी आहे. उर्वरित दहापैकी त्यांच्या आठ कसोटी मायदेशी बाकी आहेत, त्यापैकी सहा ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध आहेत, ज्या दोन्ही संघांनी अलीकडच्या काळात या भूमीवर चांगली कामगिरी केली आहे. सहा विजय आणि एक बरोबरी त्यांना ६६.६७% PCT पर्यंत पोहोचवेल, तर सात विजय त्यांना ७०% च्या पुढे घेऊन जातील, जे पुढील जूनमध्ये ओव्हल येथे खेळण्यासाठी तिकीट मिळवण्याकरिता पुरेसे असावे.

### न्यूझीलंड

उरलेल्या मालिकाः भारत (२ कसोटी, मायदेशी); पाकिस्तान (२ कसोटी, परदेशात); ऑस्ट्रेलिया (४ कसोटी, परदेशात); श्रीलंका (२ कसोटी, मायदेशी)

न्यूझीलंडने मायदेशी वेस्ट इंडिजविरुद्ध आणि परदेशात इंग्लंडविरुद्ध विजय मिळवून या स्पर्धेची चांगली सुरुवात केली आहे आणि सध्या ते ७२.२२% टक्केवारीसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहेत. जर त्यांनी मायदेशी राहिलेल्या दोन्ही मालिका - भारत आणि श्रीलंका यांच्याविरुद्ध, ज्यापैकी कोणीही गेल्या १५ वर्षांत या भूमीवर विजय मिळवलेला नाही - जिंकल्या आणि परदेशातील सहा कसोटींपैकी दोन जिंकल्या, तर ते ६५% टक्केवारीच्या जवळ पोहोचतील. जर त्यांनी उर्वरित दहापैकी सात सामने जिंकले, तर ते ७०.८३% टक्केवारीवर पोहोचतील.

### बांग्लादेश

उरलेल्या मालिकाः दक्षिण आफ्रिका (२ कसोटी, परदेशात); वेस्ट इंडिज (२ कसोटी, मायदेशी); इंग्लंड (२ कसोटी, मायदेशी)

बांग्लादेश संघ विश्वचषक स्पर्धेच्या चारही आवृत्त्यांमध्ये आपल्या सर्वोत्तम कामगिरीच्या मध्यात आहे आणि सध्या भारत, इंग्लंड आणि श्रीलंका यांसारख्या संघांच्या पुढे चौथ्या स्थानावर आहे. त्यांच्या उर्वरित सहा कसोटी सामन्यांपैकी चार सामने मायदेशात आणि गैर-आशियाई संघांविरुद्ध आहेत आणि पात्र ठरण्याची संधी मिळवण्यासाठी त्यांना या सामन्यांमध्ये सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. परंतु स्पर्धेत असलेल्या संघांमध्ये, त्यांना सर्वात कमी सामने (सहा) खेळायचे आहेत आणि प्रत्येक निकालाचा त्यांच्या पात्र ठरण्याच्या शक्यतेवर अधिक परिणाम होईल. जर त्यांनी चार सामने जिंकले आणि इतर दोन अनिर्णित राहिले, तर त्यांची शक्यता ६६.६७% होईल, तर चार विजय आणि दोन पराभव झाल्यास ती ६१.११% होईल.

### भारत

उर्वरित मालिकाः न्यूझीलंड (२ कसोटी, परदेशात); ऑस्ट्रेलिया (५ कसोटी, मायदेशात)

कोलंबो एसएससी येथे अनिर्णित राहिलेल्या कसोटीमुळे भारताला श्रीलंका दौऱ्यात उपलब्ध असलेल्या २४ गुणांऐवजी १६ गुणांवर समाधान मानावे लागले आहे आणि त्यामुळे ते एका अवघड परिस्थितीत सापडले आहेत. ते सध्या ५१.५२% पीसीटीसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहेत आणि जर त्यांनी उर्वरित सातही कसोटी सामने जिंकले, तर त्यांची शक्यता ७०.३७% पीसीटी होईल. सहा विजय आणि एक पराभव त्यांना ६५% पीसीटीच्या जवळ घेऊन जाईल आणि त्यामुळे ते ऑस्ट्रेलियाकडून मोठ्या प्रमाणात गुण कमी करतील, ज्यांच्याविरुद्ध ते पाच कसोटी सामने खेळणार आहेत. जर ते न्यूझीलंडमध्ये ०-२ ने हरले आणि मायदेशात ऑस्ट्रेलियाला ५-० ने हरवले, तर ते ५९.२६% पीसीटीसह स्पर्धेचा शेवट करतील आणि त्यांना इतर सामन्यांचे निकाल त्यांच्या बाजूने लागण्याची शक्यता आहे.

### श्रीलंका

उरलेल्या मालिकाः पाकिस्तान (२ कसोटी, परदेशात); न्यूझीलंड (२ कसोटी, परदेशात); दक्षिण आफ्रिका (२ कसोटी, मायदेशात)

एसएससी येथे झालेल्या चुरशीच्या बरोबरीमुळे श्रीलंकेचा उत्साह वाढला असेल, पण डब्ल्यूटीसी गुणतालिकेतील त्यांची आधीच नाजूक असलेली स्थिती सुधारण्यासाठी त्याचा फारसा उपयोग होणार नाही. मायदेशातील भारताविरुद्धची मालिका संपताना त्यांना उपलब्ध असलेल्या २४ गुणांपैकी फक्त चार गुण मिळाले आहेत आणि त्यांच्या हातात असलेल्या तीनपैकी फक्त एकच मायदेशातील मालिका शिल्लक आहे. त्यांच्या उर्वरित सहाही सामन्यांमधील विजय त्यांना केवळ ६६.६७% पीसीटी पर्यंतच घेऊन जाऊ शकतात, ज्यासाठी पात्र ठरण्याच्या चमत्कारिक संधीकरिता इतर अनेक सामन्यांचे निकाल त्यांच्या बाजूने लागण्याची शक्यता आहे.

### इंग्लंड, पाकिस्तान आणि वेस्ट इंडिज

या तिन्ही संघांना अव्वल दोनमध्ये स्थान मिळवण्याची शक्यता तुलनेने नगण्य आहे आणि ते अनुक्रमे ५३.१७%, ५६.४१% आणि ३२.१४% ची कमाल मर्यादा गाठू शकतात, जे कदाचित पुरेसे ठरणार नाही.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# आरोग्य तपासणीसोबत सायबर सुरक्षेचे धडे

## जामगावातील १८० विद्यार्थ्यांना लाभला अनोख्या उपक्रमाचा फायदा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना बदलत्या डिजिटल युगातील सायबर सुरक्षेचे धडे देणारा अनोखा उपक्रम जामगाव येथे राबविण्यात आला. मी टू वी फाउंडेशन, नागपूर यांच्या वतीने टरएळउछच्या उरफ उपक्रमांतर्गत तसेच श्री दत्त क्लिनिक, भारसिंगी यांच्या सहकायार्ने नरखेड तालुक्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, जामगाव येथे विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर व डिजिटल जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात तब्बल १८० विद्यार्थ्यांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी करण्यात आली असून सर्व विद्यार्थ्यांना डेंटल किटचे वाटप करण्यात आले. दि.



२७ रोजी आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर दोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. पारूल प्रतीक ढोकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आरोग्य तपासणी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये उंची व वजनाच्या आधारे बॉडी मास इंडेक्स, दातांची तपासणी तसेच त्वचेची तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, दातांची नियमित निगा, सकस व संतुलित आहार, स्वच्छ सवयी आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्यात आले.

मी टू वी फाउंडेशनचे प्रतीक ढोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी डिजिटल जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत संगणकाचे मूलभूत ज्ञान, इंटरनेटचा सुरक्षित वापर, सायबर सुरक्षा, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर तसेच ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

डिजिटल व्यवहार आणि सोशल मीडियाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांनी अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती शेअर करू नये, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये तसेच पासवर्ड आणि इतर महत्त्वाची माहिती सुरक्षित ठेवावी, असेही मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षण आणि भविष्यातील करिअरमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन तंत्रज्ञानाचा सकारात्मक, जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना डिजिटल युगातील आव्हानांसाठी सज्ज करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. आरोग्य आणि सायबर सुरक्षा या दोन्ही महत्त्वाच्या विषयांची एकत्रित माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

> या आरोग्य तपासणी शिबिरामुळे आम्हाला आमच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत महत्त्वाची माहिती मिळाली. उंची-वजन, दात व त्वचेची तपासणी करण्यात आली तसेच डेंटल किटही देण्यात आली. डिजिटल जनजागृती कार्यशाळेत इंटरनेटचा सुरक्षित वापर आणि ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव कसा करावा, हेही समजले. अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी निश्चितच फायदेशीर असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्यात यावेत.
>
> **– आरुषी संजय जुगसनिया, इयत्ता ९ वी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, जामगाव**

## आरपीएफ जवानांसोबत अनोखा स्नेहबंध, जनजागृती सेवा संस्था आयोजित रक्षाबंधन सोहळ्यास महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, ठाकुर्ली-गुरुनाथ तिरपणकर**

जनजागृती सेवा संस्थेच्या पुढाकाराने ठाकुर्ली येथील रेल्वे सुरक्षा बल बारावी बटालियनच्या छावणीला भेट देण्याचे सौभाग्य लाभले. रेल्वे सुरक्षा बलाचे जवान अहोरात्र सेवा बजावत असल्यामुळे लाखो नागरिक सुरक्षितपणे रेल्वे प्रवास करू शकतात. त्याचप्रमाणे देशाच्या सीमेचे रक्षण करणारे आपले वीर जवान देशाचे संरक्षण करत असल्यामुळे आपण सुरक्षित जीवन जगू शकतो. त्यांच्या या निस्वार्थ आणि राष्ट्रसेवेच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने रक्षाबंधनाच्या निमित्ताने जनजागृती सेवा संस्थेच्या महिला भगिनींनी आरपीएफच्या जवानांना राखी बांधून रक्षाबंधनाचा स्नेहबंध दृढ केला.रेल्वे सुरक्षा बलाचे अरक्(व्यवस्थापक)राजू कुमार सिंह यांचे या रक्षाबंधन कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.तसेच निरिक्षक आर.के.पाण्डे, निरिक्षक दिनेश कुमार, निरीक्षक सुनीता यादव, सहाय्यक उपनिरीक्षक राजू कुमार सिंह हे उपस्थित होते.

या प्रसंगी अधिकारी वर्ग तसेच बटालियनमधील जवानांनी मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने रक्षाबंधनाचा हा उत्सव साजरा केला. जवान आणि भगिनी यांच्यातील हा भावनिक क्षण सर्वांसाठीच अविस्मरणीय ठरला. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जनजागृती सेवा संस्थेच्या खजिनदार श्रुती उरणकर मॅडम यांच्यासह संस्थेचे अनेक पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते कैलास सणस, सचिन उबाळे आणि संदेश कदम यांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहून सहभाग नोंदविला. रक्षाबंधनाच्या या विशेष रक्षाबंधन सोहळ्यासाठी डोंबिवली येथील नारी उन्नती सोशल फाउंडेशन, ओम साई महिला बचत गट, विश्वकर्मा महिला बचत गट,साई विठ्ठल महिला बचत गट, ओम साई महिला बचत गट,दर्शांकिनी महिला बचत गट, डोंबिवली पूर्व महिला मंडळ, मानिनी महिला मंडळ, जनजागृती सेवा संस्था महिला गट अशा विविध संस्थांच्या महिला उपस्थित होत्या.तसेच ठाकुर्ली येथील विस्तीर्ण पसरलेल्या हिरव्यागार हिरवळीवर महिलांनी रेल्वे सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करुन वृक्ष संवर्धनाचा संदेश दिला. रक्षाबंधनाच्या या पवित्र पर्वानिमित्त सर्व वीर जवानांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेचे जेष्ठ सल्लागार राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर, अँन्टीपायरसी सेल मुंबईचे मुख्य तपासी अधिकारी रामजित(जितू) गुप्ता,उषा हॉस्पिटलीटीचे संचालक अरविंद सुर्वे, समाजसेवक कैलास सणस, सेवा समाधान फाऊंडेशनचे अध्यक्ष गजानन फडकले आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कवियत्री, निवेदिका सुनिता काटकर यांनी केले.

## २०० नेत्रदात्यांच्या परिवाराचा सन्मान सोहळा ३० ऑगस्ट रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** २०२५-२६ या कालावधीमध्ये विविध संस्थांच्या माध्यमातून नेत्रदान करून अनेकांचे आयुष्य प्रकाशमान करणाऱ्या २०० नेत्रदात्यांच्या परिवाराचा सन्मान सोहळा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स सभागृह, हडस हायस्कूलजवळ, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय नेत्रदान पंधरवड्यानिमित्त नेत्रदानासारख्या पवित्र व निःस्वार्थ कायार्ला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित या या सोहळ्याला झेडटीसीसी नागपूरचे अध्यक्ष डॉ. मनीष श्रीगीरीवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, एनएसएसएल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आनंद जयस्वाल यांची विशेष उपस्थिती राहील. महावितरण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. रौशनी फाउंडेशन नागपूरच्यावतीने व महात्मे आय बँक व महात्मे आय हॉस्पिटल, माधव नेत्रालय अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बाप्पाच्या स्वागतासोबतच सुरक्षेला प्राधान्य द्याः गणेशोत्सव मंडळांना महावितरणचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री गणेशरायांच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू असून, ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा होणाऱ्या या उत्सवात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी महावितरणने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना वीज सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या आनंदात कुठलेही विघ्न येऊ नये, यासाठी अधिकृत आणि सुरक्षित वीज जोडणी घेणे महत्त्वाचे असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.



महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य उत्सव' म्हणून घोषित केले आहे. सार्वजनिक उत्सव आनंददायी आणि सुरक्षित करण्यासाठी, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सार्वजनिक उत्सवांसाठी तात्पुरत्या वीज जोडणीसाठी घरगुती दराचे वीजदर निश्चित केले आहेत. यामुळे मंडळांनी अनधिकृत जोडण्या टाळाव्यात आणि अधिकृत वीजपुरवठा घ्यावा, जेणेकरून संभाव्य अपघातांचा धोका टाळता येईल. मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था केवळ अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेण्याची सूचनाही महावितरणने दिली आहे.

सुरक्षित उत्सवासाठी काही महत्त्वाची खबरदारी बाळगणे गरजेचे आहे. यामध्ये रोषणाई आणि देखावे उभारताना परिसरातील वीज वाहिन्या, खांब किंवा वितरण रोहित्रांपासून सुरक्षित अंतर ठेवावे. वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घ्यावा, ज्यामुळे जनरेटरमधील वीज लघुदाब वाहिनीत प्रवाहित होऊन होणारे अपघात टाळता येतात. जवळच्या वीज खांबांवर किंवा वाहिन्यांवर 'हुक' टाकून वीज घेणे टाळावे, कारण यामुळे जीवित आणि वित्तहानीचा मोठा धोका असतो. वीज जोडणीसाठी वापरण्यात येणारी तार किंवा केबल विजेचा भार पेलण्यास सक्षम असल्याची खात्री करून जुनी किंवा तुटलेली तार वापरू नये. तसेच सर्व विद्युत उपकरणांचे योग्य अर्थिंग असल्याची खात्री करून वेळोवेळी त्याची चाचणी घ्यावी आणि एकाच मल्टी प्लगवर अनेक उपकरणे जोडणे टाळावे.

मंडळांच्या सोयीसाठी महावितरण आपल्या सर्व कार्यालयांतून विशेष शिबिरे आयोजित करत असून या शिबिरात मंडळांना आवश्यक ती सर्व मदत दिली जात आहे.

या जोडणीसाठी मंडळांना नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी, पोलीस परवाना आणि विद्युत निरीक्षकांचे प्रमाणपत्र कागदपत्रे सादर करावी लागतील. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, तात्पुरत्या जोडणीसाठी भरलेली अनामत रक्कम मंडळांना विनाविलंब परत मिळणार आहे. मंडळांनी ही रक्कम ऑनलाइन भरल्यास, गणेशोत्सव संपल्यानंतर वीज बिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम लगेच परत दिली जाईल, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे.

आणीबाणीच्या परिस्थितीत मदतीसाठी मंडळांनी २४ तास सुरू असणाऱ्या १९१२, १९१२०, १८००-२३३-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. याशिवाय, संबंधित भागातील महावितरणच्या अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावेत. बाप्पाचा उत्सव साजरा करताना सुरक्षेला प्राधान्य देऊन एका जबाबदार मंडळाची ओळख निर्माण करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## श्री अकादमीतर्फे JEE, NEET, NDA व MHT-CET पात्र विद्यार्थ्यांचा गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी श्री अकादमी, ओमकार नगर, नागपूर च्यावतीने JEE, NEET, NDA U MHT-CET परीक्षेत यश संपादन करून पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. रविवारी २३ ऑगस्ट रोजी बाकडे सेलिब्रेशन, नागपूर येथे हा कार्यक्रम मोठ्या संख्येने उत्साहात पार पडला. श्री अकादमीच्या संचालिका डॉ. जयश्री मडावी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.



शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक तयारी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री अकादमीकडून सातत्याने विविध उपक्रम राबविले जाते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून गिरीश पांडव, आमदार सुधाकर कोहळे, डॉ. लोहित मतानी, डॉ. भौमिक, डॉ. चौधरी, डॉ. दामयंती वाळके तसेच प्रा. माधुरीताई पालीवाल यांची उपस्थिती होती. मान्यवरांचे श्री अकादमीच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. यानंतर JEE, NEET, NDA आणि MHT- CET या विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांची सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द, शिस्त आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात. स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ अभ्यासच नव्हे, तर सातत्य, वेळेचे योग्य नियोजन, आत्मविश्वास आणि ध्येय निश्चित करून केलेली मेहनत आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे त्यांच्या पालकांमध्येही आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. पालकांनी आपल्या मुलांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत श्री अकादमीच्या संचालिका, शिक्षकवृंद आणि मार्गदर्शकांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीदरम्यान मिळालेले मार्गदर्शन आणि प्रोत्साहन त्यांच्या यशासाठी उपयुक्त ठरल्याचे पालकांनी सांगितले. कार्यक्रमाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळाली.

मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा संदेश या सत्कार सोहळ्यातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांचे आभार मानले. श्री अकादमीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक कायार्ला नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

### थोडक्यात

## महाराष्ट्र शेतकरी संघटनेत वृषभ राऊत यांना दुहेरी जबाबदारी, भंडारा जिल्हाध्यक्ष, गोंदिया जिल्हा संपर्क प्रमुखपदी

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या संघटनात्मक विस्ताराला अधिक गती देण्यासाठी वृषभ तेजस्विनी तुळाराम राऊत यांची भंडारा जिल्हाध्यक्ष तथा गोंदिया जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीस महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सुनील देवरे पाटील यांनी मान्यता व अनुमोदन दिले असून, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुंटे यांनी अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली. वृषभ राऊत हे यापूर्वी लाखनी तालुका अध्यक्ष म्हणून संघटनेचे कार्य पाहत होते. संघटनेशी दीर्घकाळ निष्ठेने जोडलेले, अभ्यासू, सक्रिय आणि संघटनात्मक कायार्चा अनुभव असलेले कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. ते बी.ए. एलएल.बी.च्या नवव्या सत्राचे विद्यार्थी असून, कायद्याचे ज्ञान, सामाजिक प्रश्नांची जाण आणि संघटनात्मक अनुभव यांच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडतील, अशी अपेक्षा संघटनेतर्फे व्यक्त करण्यात आली आहे. नवीन जबाबदारीनुसार भंडारा व गोंदिया जिल्ह्यांतील प्रत्येक तालुका आणि गावापर्यंत महाराष्ट्र शेतकरी संघटनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.



दोन्ही जिल्ह्यांत सक्षम तालुका अध्यक्षांची निवड करणे, ग्रामस्तरावर कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभारणे, युवक व विद्यार्थ्यांना संघटनेशी जोडणे तसेच शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनतेच्या विविध प्रश्नांवर लोकशाही मागार्ने आंदोलने, निवेदने व जनजागृती कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी राऊत यांच्यावर सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या या नव्या नियुक्तीमुळे भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील संघटनात्मक कार्याला अधिक व्यापक, गतिमान आणि प्रभावी स्वरूप मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सुनील देवरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुंटे यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही जिल्ह्यांत संघटनेची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी नव्या जोमाने कार्य केले जाणार आहे.

## यंदाचा 'उमा-गणेश स्मृती पुरस्कार-२०२६' संदीप बारस्कर यांना उद्या प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



स्व. गणेश नायडू हे अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी होते. उत्तम चित्रकार, उत्तम नट, उत्तम नेपथ्यकार, उत्तम प्रकाश योजनाकार, उत्तम दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध होते. नागपुरात सांस्कृतिक क्षेत्रातील जे भव्यदिव्य कार्यक्रम झालेत त्यात त्यांचा विषेशत्वाने सहभाग असायचा व त्या समारंभात त्यांची वेगळी अशी छाप दिसून यायची. त्यांच्या पत्नी उमा नायडू देखील त्यांच्या खांद्याला-खांदा लावून आयुष्यभर त्यांना साथ देत राहिल्या. दोघांच्याही स्मृतिप्रित्यर्थ विदर्भातील एका मान्यवर रंगकर्मीला दरवर्षी 'उमा-गणेश स्मृती पुरस्कार' देऊन विदर्भ गौरव प्रतिष्ठानच्यावतीने त्यांचा गौरव करण्यात येत असतो. पंचवीस हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

२०२६ चा 'उमा-गणेश स्मृती पुरस्कार' संदीप शेषराव बारस्कर यांना देण्यात येणार आहे. १९९५ साली दोन छोट्या स्पीकर्सपासून प्रवास सुरू करणारे संदीप बारस्कर आज भारतभर व विदेशात प्रसिद्ध ध्वनिसंयोजन तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. अत्याधुनिक तंत्रज्ञान व कुशल टीमच्या बळावर त्यांनी प्रोसाउंड ही प्रतिष्ठित कंपनी उभी केली आहे. ते उत्कृष्ट गिटारवादक पण आहित. जिद्द, कौशल्य आणि संगीताची जाण यामुळे त्यांनी या क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. हा पुरस्कार श्री सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष व माजी आमदार संदीप जोशी यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश एदलाबादकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य व शिक्षणतज्ज्ञ पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री राहतील.

उद्या रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी सायं. ५ वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुल, व्होकार्ट हॉस्पिटलच्या मागे शंकरनगर चौक, नागपूर येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी अवश्य यावे असे आवाहन डॉ. गिरीश गांधी, प्रफुल्ल गाडगे, अतुल दुरगकर, निलेश खांडेकर, शुभदा फडणवीस, रुपाली मोरे, अँड. फिरदोस मिर्झा, विष्णू मनोहर, प्रेमकुमार लुनावत, बाळ कुळकर्णी, प्रगती पाटील, दिलीप जाधव व मित्र परिवार यांनी केले आहे.

## विलास गजघाटे यांचा वाढदिवस उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. विलासजी गजघाटे यांचा वाढदिवस विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दीक्षाभूमीच्या पवित्र कायार्ला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना पुढे नेण्यासाठी विलास गजघाटे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या नेतृत्वातून दीक्षाभूमीच्या कायार्ला अधिक व्यापक दिशा मिळावी, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

दीक्षाभूमीच्या पवित्र कार्यात आपले मार्गदर्शन व नेतृत्व सदैव लाभत राहो. आपणास उत्तम आरोग्य, दीघार्युष्य, सुख- समृद्धी आणि सामाजिक कायार्साठी नवी ऊर्जा लाभो, अशा शुभेच्छाही यावेळी देण्यात आल्या. याप्रसंगी हंसराज भांगे, दीक्षाभूमी ट्रस्टी एन.आर.सूटे, फिशरी बोर्ड महासंघाचे अध्यक्ष प्रेम गजभिये, नरेश महाजन, रिपाईचे शहर महासचिव रजत महेश गवडी, सुभाष शेंडे आदींनी मनोगत व्यक्त करून विलास गजघाटे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम यांनी केले. यावेळी देवाजी रंगारी, विठ्ठल ढोंगडे, विजय सुरवाडे, अशोक शेंद्रे, सुनील भोसले, मिलिंद थुल, विजय मेश्राम, अमोल पाटील, रामभाऊ बागडे, विशाल शुक्ला यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

थोडक्यात

## नबीरा कनिष्ठ महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावर कार्यशाळेचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नबीरा कनिष्ठ महाविद्यालय, काटोल येथे विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी तसेच एआयच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या विविध शैक्षणिक व रोजगाराच्या संधींची माहिती मिळावी, या उद्देशाने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ई-जनरेशन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, काटोलचे संचालक योगेश भोसे यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना, दैनंदिन जीवनातील एआयचा वाढता वापर, विविध डिजिटल साधने तसेच भविष्यातील रोजगाराच्या बदलत्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. एआयचे ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या अनेक नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षिका श्रद्धा चांडक मॅडम होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक व सर्जनशील वापर करून आपल्या कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहन केले. प्रा. राठोड सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात अद्ययावत ज्ञान आत्मसात करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैष्णवी उमप मॅडम यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अभिजीत देशमुख यांनी केले. या कार्यशाळेला नबीरा कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी तसेच शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत एआय, तंत्रज्ञान आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींबाबत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख, कौशल्यविकास आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी यांचा प्रभावी संगम घडवून आणणारी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक व उपयुक्त ठरली.

## पीएमश्री शाळा दहेगाव येथे विद्यार्थ्यांकडून राखी बनवण्याचे उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे राखी या सण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांकडून राखी बनवण्याचं उपक्रम घेण्यात आले.राखी या सणाचे महत्त्व मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी विद्यार्थ्यांना केले. राखी या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे विविध गट तयार करून त्या गटात राख्या बनवण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध आकाराच्या योग्य, आकाराच्या विविध राख्या बनवण्यात आला. सुरुवातीला शिक्षिका सुजाता बोदेले यांनी राख्या कशा बनवायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. या उपक्रमांतर्गत प्रथम क्रमांक मंथन आंबीलढुके वर्ग सातवा, द्वितीय क्रमांक स्वरा होमराज हटवार या विद्यार्थ्यांचा आला.

याप्रसंगी बहिण भावामध्ये कसे प्रेम निर्माण होईल याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगावातील विद्यार्थिनीनी विद्यार्थ्यांना राखी बांधल्या. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे,सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे,राजेश रोहाड, सुजाता बोधले, प्रज्ञा रामटेके, संगीता कारेमोरे, ज्योती आंबिलढुके, उमेश उके, पुष्पलता उके यांनी सहकार्य केले.

## 'आपल्या लाडक्या बाप्पाला रंगांनी सजवूया!'

### बालकला अकादमीच्या चित्रकला स्पर्धेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत करा नोंदणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बालकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, पम्पकी आणि बालकला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या लाडक्या बाप्पाला



रंगांनी सजवूया! या संकल्पनेवर आधारित शालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गट अ - वय वर्षे ३ ते ६, गट ब - वय वर्षे ७ ते १० आणि गट क - वय वर्षे ११ ते १३ अशा तीन गटात होणाऱ्या स्पर्धेसाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नोंदणी करायची आहे. स्पर्धकांना आयोजकांकडून ड्रॉइंग शीट देण्यात येणार असून, त्यावरच चित्र काढणे बंधनकारक राहील.

चित्र रंगविण्यासाठी लागणारे साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणायचे आहे. येत्या, ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, महाल, नागपूर येथे ही स्पर्धा होईल. प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून, आयोजकांचा निर्णय अंतिम राहील. अधिक माहितीसाठी व नावे नोंदणीसाठी कोमल चौधरी - ९९२३९२१६७६व समिक्षा लाखे - ९८३४०७३६२२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळवले आहे.

# भाडीपार गाव पायाभूत सुविधांपासून वंचित?

### जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना अधिक त्रास, गटशिक्षणाधिकारी सह सभापतींना दिले निवेदन




**दै. सिंहवाणी वृत्त, प्रकाश टेंभरे-सालेकसा**

गोंदिया जिल्ह्यातील बोदलबोडी ग्रामपंचायत अंतर्गत अतिदुर्गम भागात व आदिवासी तसेच पुरग्रस्त गाव म्हणून जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात असलेला भाडीपार या गावी आजही स्वातंत्र्याच्या ८० वर्षानंतर वार्ड क्रमांक तीन येथे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे शासकीय पत्रावर रस्ते आणि नाले काम झाल्याचे दाखवून पण प्रत्यक्षात तिथे काहीच काम झालेले नाही. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत दुचाकी घसरून अपघात होऊ शकतात लहान मुलांना त्याच्या अधिक त्रास सहन करावं लागते. नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने कचरा अडकून सांड पाणी रस्त्यावर वाहत आहे रस्त्या रस्त्यावरील सांडपाण्यामुळे परिसरात डासांच्या पादुर्भाव वाढला असून डेंगू मलेरिया सारख्या आजारावर धोका निर्माण झाला आहे.

अनेक समस्यांना पुढे जावे लागत आहे, त्यामुळे ग्रामपंचायतीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत असून येथील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही व शाळेकडे जाणारा एकमेव मार्ग असून याच रस्त्यावरून विद्यार्थी येजा करीत आहेत.

नाली सफाई न करता बिल काढले जात आहेत व पाच वर्षाच्या आधीच नाली पूर्णपणे खचून गेल्याने पाणी एकाच ठिकाणी साचलेला असतो त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. विशेष म्हणजे नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही जिल्हा परिषदचे सदस्यांना व ग्रामपंचायतला तक्रार करूनही कोणतेही ठोस कारवाई केलेली नाही. शाळेकरी विद्यार्थ्यांना फार मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत गटशिक्षणाधिकारी गटविकास अधिकारी सभापती उपसभापती यांनाही निवेदन दिले असून सदर निवेदन देताना ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम फुंडे, नुरसिंह हरिणखेडे, सोमा गेडाम, प्रेमलाल हरीणखेडे , नंदलाल गेडाम, मोतीलाल हरिणखेडे यांच्यासह गावातील इतर ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

तत्कालीन सरपंच गिता नाईक हे पाच वर्ष सरपंच राहिले. त्यांच्या काळात सुद्धा ग्रामसेवक आर.एम रामटेके होते व आजही ते आहेत. असे मिळून नऊ वर्ष एकाच ठिकाणी कार्यरत असून त्यांची पत्नी सुद्धा जमाकुडो दरेकसा येथे एकाच तालुक्यात दोन्ही व्यक्ती काम करत आहेत. ते मुख्यालयी राहत नाही व रामटेके यांच्याकडेही सध्या अतिरिक्त कार्यभार बोदलबोडी व झालीया आहे. त्यांना तात्काळ हटवून दुसऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम फुंडे, नृरसिंह हरींणखेडे, राजकुमार हरिणखेडे, पप्पु पारधी व ग्रामस्थांकडून केले जात आहे.

आता तरी ग्रामपंचायत व जिल्हा परिषदच्या लोकांनी समस्येकडे गांभीर्य ने पाहणार का? की मोठ्या आजाराच्या व अपघाताचे वाट पाहतील का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या समस्येवर त्वरित तोडगा न निघाल्यास हिरवं आंदोलन करण्याच्या इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

## सागात अडकलेले ३७ भाविक काठमांडूकडे सुखरूप रवाना



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करून परतीच्या प्रवासात तिबेटमधील सागा येथे महाराष्ट्रातील ३७ भाविक अडकले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तातडीच्या पुढाकारानंतर सर्व भाविक आज सकाळी ६ वाजता सागा येथून न्यालम चेक पोस्टमार्गे काठमांडूकडे सुखरूप रवाना झाले आहेत.

ठाणे, पुणे, अलिबाग, रायगड आणि डोंबिवली परिसरातील ३७ भाविक कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते. परतीच्या प्रवासादरम्यान ते सागा येथे अडकले. त्यांचे काठमांडूहून परतीचे विमान २९ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता नियोजित असल्याने वेळेत काठमांडू गाठणे आवश्यक होते. याबाबत माहिती मिळताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्वरित भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी संपर्क साधून आवश्यक सहकार्य मिळवले आणि सर्व भाविकांचा सागा ते काठमांडू सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाला. संकटप्रसंगी तातडीने मदत मिळाल्याबद्दल सर्वांनी मुख्यमंत्री फडणवीस, महाराष्ट्र सरकार तसेच भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे आभार व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या फोननंतर काठमांडूवरून जनकपूरपर्यंत नेपाळचे खासदार संदीप राणा यांनी त्यांना स्थानिक ४ मिनी बस करून दिल्या. हे सर्व लोक जनकपूर (बिहार) बॉर्डरला उद्या सकाळी पोहोचतील. दानापूरपर्यंत (बिहार) त्यांच्यासाठी बसेस केल्या आहेत. तेथून रेल्वेने त्यांची परतण्याची व्यवस्था झालेली आहे.

## १३ महिला गटांनी आपल्या सादरीकरणातून महाराष्ट्राच्या लोकपरंपरा आणि संस्कृतीचे दाखविले रंग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

माऊली आरोग्य धनसंपदा संस्थेच्या मुख्य आयोजिका कविता रेवतकर यांच्या नेतृत्वाखाली, मधुरम सभागृहात महाराष्ट्राच्या पारंपरिक लोकसंस्कृती आणि श्रावणी उत्सवाची मनमोहक झलक सादर करणारी 'मंगलागौर श्रावण कवी स्पर्धा' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या 'नवरंग' उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात १३ महिला गटांनी उत्साहाने सहभाग घेतला.



स्पधेर्तील महिलांनी पारंपरिक श्रावण पोशाख, लोकगीते, संगीत आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली कला सादर केली. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी आणि त्यांच्या मनमोहक सादरीकरणाने सभागृह श्रावण उत्सवाच्या रंगांनी भरून टाकले. या कार्यक्रमाने महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाची एक सुंदर झलक दाखवली.

नागसेविका शारदा बराई, राजलक्ष्मी झाडे, राजू बावनकुळे, डॉ. श्रीरंग वहाडपांडे आणि ज्योती द्विवेदी यांच्यासह उपस्थित असलेल्या पाहुण्यांच्या हस्ते देवी सरस्वतीच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

मुख्य आयोजक कविता रेवतकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि उद्दिष्टे अधोरेखित करून सहभागींना प्रोत्साहित केले. दरम्यान, नवरंग समन्वयक सुजाता दुबे यांनी संस्थेचा परिचय करून दिला आणि तिच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

तेरा महिला गटांनी स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण रोशनी तिरपुडे आणि रंजना शिंगाडे यांनी केले. उषा शिंदे (गुरुकृपा योग गट) यांनी प्रथम, ईशा रंदिवे (मित्र विहार, आराधना नगर) यांनी द्वितीय, तर ज्योती धागे आणि प्रियांका केळवाडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. उपस्थितांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे व सन्मान प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या महिलांचा उत्साही सहभाग हे कार्यक्रमाचे एक विशेष आकर्षण होते. पारंपरिक वेशभूषा, लोकगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी सभागृहात उत्सवाचे वातावरण निर्माण केले होते.

अंजुषा भटनागर यांनी कार्यक्रमाचे प्रभावीपणे सूत्रसंचालन केले. शेवटी, सुजाता दुबे यांनी सर्व पाहुणे, सहभागी आणि सहकाऱ्यांचे आभार मानले.

## वाडीत ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिर



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

गव्हर्नमेंट पेन्शनर्स असोसिएशन व वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान मंदिर सभागृहात वरिष्ठ नागरिकांसाठी आरोग्य जनजागृती शिबिर दत्तवाडीतील गजानन मंदिर प्रांगणात घेण्यात आले. शिबिरात १०० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांची बीपी, शुगर, ईसीजी व बीएमडी तपासणी करण्यात आली. ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. मुकुंद अग्रवाल यांनी गुडघे, कंबर व खांदेदुखीबाबत मार्गदर्शन करत नियमित व्यायामामुळे अनेक हाडांच्या समस्यांवर शस्त्रक्रियेशिवाय आराम मिळू शकतो, असे सांगितले. त्यांनी प्रात्यक्षिकासह व्यायामाचे महत्त्व समजावून सांगितले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष एन. एन. मिश्रा, सचिव के. बी. इंगळे यांच्यासह एन. एम. लिमये, एस. पी. गजभिये, व्ही. जी. बालपांडे, डी. डी. गजभिये, बी. आर. रीनके, एस. एस. काळपांडे व बी. ए. भोस्कर यांनी परिश्रम घेतले.

# हिरव्या रंगात नटल्या जलालखेड्यातील महिला, श्रावण सोहळ्यात उत्साहाचा जल्लोष!

### विविध खेळांची रंगली मैफल, महाकाली मंदिर परिसरात पारंपरिक झोक्यावर महिलांचा मनमुराद आनंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

श्रावण महिना म्हटला की हिरवाई, सण-उत्सव आणि महिलांच्या उत्साहाला विशेष उधाण येते. याच पार्श्वभूमीवर नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथे महिलांनी एकत्र येत मोठ्या उत्साहात श्रावण सोहळा साजरा केला. ऐतिहासिक किल्ल्यात विराजमान असलेल्या प्राचीन महाकाली मंदिराच्या अंगणात आयोजित या सोहळ्यात पारंपरिक संस्कृती, धार्मिक वातावरण, मनोरंजन आणि महिला एकोपा यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

हिरव्या रंगाच्या आकर्षक साड्या, ड्रेस, हिरव्या बांगड्या आणि पारंपरिक दागिन्यांनी सजलेल्या महिला व मुलींनी या सोहळ्यात मोठ्या संख्येने



सहभाग नोंदविला. त्यामुळे महाकाली मंदिराचा परिसर अक्षरशः हिरवाईच्या रंगात नटल्याचे चित्र पाहायला मिळाले. श्रावणाच्या पारंपरिक वातावरणात महिलांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

या श्रावण सोहळ्यात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक तसेच पारंपरिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी कोणताही संकोच न बाळगता उत्स्फूर्तपणे खेळांमध्ये सहभाग घेतला. खेळादरम्यान हास्य-विनोद, टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोषाने परिसर दुमदुमून गेला. विविध खेळांमुळे महिलांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण कायम होते.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरला तो पारंपरिक पद्धतीने सजविण्यात आलेला झोका. श्रावणातील झुलण्याची परंपरा जपत महिलांनी झोक्यावर मनमुराद आनंद घेतला. झोक्यावर झुलताना अनेक महिलांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. झोक्याभोवती महिलांची मोठी गर्दी झाली होती. एकमेकींना प्रोत्साहन देत, गप्पा मारत आणि आनंदी क्षण अनुभवत महिलांनी श्रावणाचा उत्सव साजरा केला.

दैनंदिन घरकाम, कुटुंबाची जबाबदारी आणि धावपळीच्या जीवनातून महिलांना काही काळ विरंगुळा मिळावा, या उद्देशाने अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे ठरत आहे. श्रावण सोहळ्याच्या निमित्ताने गावातील विविध वयोगटातील महिला आणि मुली एकाच ठिकाणी एकत्र आल्याने सामाजिक सलोखा आणि आपुलकीची भावना अधिक दृढ झाली.

धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपत नव्या पिढीलाही या परंपरांची ओळख व्हावी, यासाठी अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व असल्याचे उपस्थित महिलांनी सांगितले. श्रावणातील हिरव्या रंगाचे सांस्कृतिक महत्त्व जपत महिलांनी पारंपरिक वेशभूषेला प्राधान्य दिल्याने सोहळ्याची रंगत आणखी वाढली होती.

महाकाली मंदिराच्या पवित्र आणि ऐतिहासिक परिसरात झालेल्या या सोहळ्यामुळे कार्यक्रमाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. महिला एकत्र आल्याने परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. एकीकडे पारंपरिक खेळांची रंगलेली मैफल, तर दुसरीकडे झोक्याचा आनंद आणि महिलांच्या हास्य-विनोदामुळे श्रावण सोहळा अविस्मरणीय ठरला.

जलालखेडा परिसरातील महिलांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांच्या आनंदी सहभागामुळे हा सोहळा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न ठरता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक जतन आणि महिला एकत्रीकरणाचा उत्सव ठरला. हिरव्या रंगात नटलेल्या महिलांचा उत्साह, पारंपरिक झोक्यावरील आनंद आणि विविध खेळांमुळे जलालखेड्यात श्रावणोत्सवाचा जल्लोष रंगला होता.

# विवाहसंस्था, नैतिकता आणि बदलते सामाजिक वास्तव

सतिश तुळसकर
उमरेड

मनुस्मृतीचा संदर्भ घेताना तिच्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. मनुस्मृती ही प्राचीन काळातील सामाजिक नियम, कर्तव्ये आणि आचारसंहितेचे प्रतिबिंब आहे; मात्र आजचे समाजजीवन, कायदे, स्त्री-पुरुषांचे अधिकार आणि वैवाहिक संबंधांची रचना पूर्णपणे बदलली आहे. त्यामुळे तिच्यातील प्रत्येक नियम आजच्या काळात जसाच्या तसा लागू करणे योग्य ठरणार नाही.

पूर्वी विवाह टिकून राहायचे आणि महिला एका नवऱ्यासोबत प्रामाणिक राहायच्या, असे अनेकदा म्हटले जाते. त्या काळात कुटुंब, धर्म, सामाजिक प्रतिष्ठा आणि परंपरा यांना मोठे महत्त्व होते. विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा संबंध नसून दोन कुटुंबांचा आणि सामाजिक व्यवस्थेचा आधार मानला जात असे. स्त्रीने पतीशी निष्ठावान राहावे, कुटुंबाची सेवा करावी आणि वैवाहिक नाते कोणत्याही परिस्थितीत टिकवावे, अशी अपेक्षा तिच्यावर ठेवली जात असे.

मात्र विवाह टिकला म्हणजे तो नेहमीच आनंदी, सुरक्षित आणि न्याय्य होता, असे मानता येत नाही. पूर्वी अनेक महिलांना शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, संपत्तीवरील अधिकार, घटस्फोटाचा पर्याय किंवा कौटुंबिक हिंसेविरुद्ध आवाज उठवण्याचे स्वातंत्र्य उपलब्ध नव्हते. सामाजिक दबाव, मुलांची जबाबदारी, आर्थिक अवलंबित्व आणि कुटुंबाच्या प्रतिष्ठेची भीती यामुळे अनेक स्त्रिया अन्याय सहन करत राहिल्या. त्यामुळे त्या काळातील विवाह टिकण्यामागे प्रेम आणि निष्ठेबरोबरच असहायता आणि सामाजिक बंधनेही कारणीभूत असू शकतात.

मनुस्मृतीत कर्तव्य, संयम, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक शिस्त यांना महत्त्व दिले आहे. परंतु आजच्या काळात कोणत्याही ग्रंथाचा अर्थ लावताना समानता, मानवी प्रतिष्ठा, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि संविधानिक अधिकार यांचा विचार करणे आवश्यक आहे. स्त्रीने पतीशी निष्ठावान राहावे, ही अपेक्षा योग्य असेल तर पुरुषानेही पत्नीशी प्रामाणिक, जबाबदार आणि आदरपूर्ण राहणे तितकेच आवश्यक आहे. नैतिकतेचे नियम एकतर्फी नसावेत; ते स्त्री आणि पुरुष दोघांनाही समानपणे लागू झाले पाहिजेत.

आज सोशल मीडियामुळे मानवी संबंधांमध्ये मोठे बदल झाले आहेत. संवादाची साधने वाढली असली तरी प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. सतत मोबाईल वापरणे, अनोळखी व्यक्तींशी भावनिक जवळीक निर्माण होणे, जुन्या संबंधांशी पुन्हा संपर्क होणे, आकर्षक जीवनशैलीचे प्रदर्शन आणि इतरांच्या आयुष्याशी स्वतःची तुलना करणे यामुळे वैवाहिक नात्यांमध्ये गैरसमज आणि असुरक्षितता वाढू शकते.

सोशल मीडिया स्वतः वाईट नाही; त्याचा गैरवापर समस्या निर्माण करतो. गुप्त संदेश, जोडीदारापासून लपवलेले संबंध, खोटे ऑनलाइन व्यक्तिमत्त्व, भावनिक फसवणूक किंवा विवाहबाह्य संबंध यामुळे विश्वासाला धक्का बसतो. मात्र या समस्या केवळ महिलांमध्येच आहेत, असे म्हणणे चुकीचे आहे. स्त्री आणि पुरुष दोघेही सोशल मीडियाचा गैरवापर करू शकतात. त्यामुळे नैतिकतेचा प्रश्न लिंगावर आधारित न ठेवता व्यक्तीच्या वर्तनावर आधारित असला पाहिजे. आज महिलांना शिक्षण, रोजगार, आर्थिक स्वावलंबन आणि कायदेशीर संरक्षण मिळत आहे. त्यामुळे त्या हिंसा, अपमान, व्यसनाधीनता, फसवणूक किंवा सततच्या मानसिक त्रासाविरुद्ध आवाज उठवू शकतात. पूर्वी सहन केले जाणारे अन्याय आज स्वीकारले जात नाहीत. विवाह तुटण्याचे प्रमाण वाढलेले दिसत असले, तरी त्यातील काही भाग हा महिलांना स्वतःच्या सन्मानासाठी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळाल्याचा परिणाम आहे.

महिलांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, असे म्हणताना त्या अपेक्षा नेमक्या कोणत्या आहेत, हे पाहणे आवश्यक आहे. शिक्षित, समजूतदार, जबाबदार आणि हिंसामुक्त जोडीदाराची अपेक्षा अवास्तव नाही. घरकामात सहभाग, मुलांच्या संगोपनात सहकार्य, आर्थिक



निर्णयांमध्ये समानता, भावनिक आधार आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची मागणी ही आधुनिक जीवनातील मूलभूत गरज आहे. पत्नीने पतीची सेवा करावी, पण पतीने पत्नीच्या भावनांकडे दुर्लक्ष करावे, अशी एकतर्फी अपेक्षा नैतिकतेच्या नावाखाली योग्य ठरू शकत नाही.

मात्र स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारीशून्य वर्तन नव्हे. जोडीदाराची फसवणूक करणे, खोटे बोलणे, नात्यातील विश्वासाचा गैरवापर करणे, घरातील जबाबदाऱ्या टाळणे किंवा सोशल मीडियावर गुप्त संबंध ठेवणे हे स्त्री किंवा पुरुष कोणाकडूनही झाले, तरी ते चुकीचेच आहे. विवाहात स्वातंत्र्यासोबत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारी आवश्यक आहे. आज विवाह तुटण्यामागे अनेक कारणे आहेत. संवादाचा अभाव, अवास्तव अपेक्षा, आर्थिक ताण, व्यसनाधीनता, घरगुती हिंसा, विवाहबाह्य संबंध, सोशल मीडियाचा अतिरेक, कुटुंबीयांचा अनावश्यक हस्तक्षेप आणि भावनिक अपरिपक्वता. काही वेळा करिअर, राहणीमान, मुलांचे संगोपन, घरकामाची वाटणी किंवा वृद्धांची जबाबदारी यावरून मतभेद वाढतात. या सर्व प्रश्नांकडे केवळ महिलांना दोष देऊन पाहणे योग्य नाही.

घरकाम, मुलांची काळजी आणि वृद्धांची सेवा ही केवळ स्त्रीची जबाबदारी नाही. त्याचप्रमाणे कुटुंबाचा आर्थिक भार उचलणे ही केवळ पुरुषाची जबाबदारी नाही. आधुनिक विवाहात दोघांनीही आपल्या क्षमतेनुसार योगदान देणे, निर्णय सामायिकपणे घेणे आणि अडचणींचा सामना एकत्र करणे गरजेचे आहे. विवाह हा मालकीहक्क नसून सहजीवनाचा करार आहे.

विवाह टिकवण्यासाठी संवाद हा सर्वात महत्त्वाचा आधार आहे. मनातील नाराजी साठवत राहणे, प्रत्येक मतभेदाला अहंकाराचा प्रश्न बनवणे किंवा शांततेच्या नावाखाली समस्या टाळणे यामुळे नाते कमकुवत होते. मतभेद होणे स्वाभाविक आहे; परंतु अपमान, धमकी, हिंसा किंवा भावनिक छळ हा संवादाचा भाग असू शकत नाही. गरज भासल्यास समुपदेशन घेणे ही कमजोरी नसून नाते सुधारण्याची परिपक्वता आहे.

तरीही प्रत्येक विवाह कोणत्याही परिस्थितीत टिकवायलाच हवा, असा आग्रह योग्य नाही. सततची हिंसा, लैंगिक अत्याचार, गंभीर मानसिक छळ, व्यसनाधीनता, फसवणूक किंवा जीविताला धोका असेल, तर सुरक्षितता आणि आत्मसन्मानाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. विवाह टिकवण्यापेक्षा माणसाचे जीवन, मानसिक आरोग्य आणि प्रतिष्ठा अधिक महत्त्वाची आहे. मुलांसाठी विवाह टिकवावा, असे अनेकदा सांगितले जाते. परंतु सतत भांडणारे, हिंसक किंवा अपमानजनक वातावरण मुलांच्या मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम करू शकते. मुलांना केवळ एकत्र राहणारे पालक नव्हे, तर सुरक्षित, प्रेमळ आणि जबाबदार वातावरण आवश्यक असते.

विवाहसंस्था टिकवायची असेल, तर स्त्रियांवर नियंत्रण ठेवून नव्हे, तर स्त्री-पुरुष समानतेवर आधारित नाते निर्माण करून टिकवावी लागेल. पत्नीने पतीचे सर्व म्हणणे मानावे आणि पतीने पत्नीच्या स्वातंत्र्यावर बंधने घालावीत, अशी जुनी चौकट आज स्वीकारता येणार नाही. विवाहात प्रेमासोबत मैत्री, विश्वासासोबत पारदर्शकता आणि स्वातंत्र्यासोबत जबाबदारी आवश्यक आहे.

आजच्या पिढीला विवाहाबद्दल वास्तववादी शिक्षण मिळणे गरजेचे आहे. विवाह म्हणजे केवळ समारंभ, सामाजिक प्रतिष्ठा किंवा आर्थिक सुरक्षितता नव्हे; तो दोन व्यक्तींनी परस्पर संमतीने स्वीकारलेला सहजीवनाचा प्रवास आहे. या प्रवासात आनंदाबरोबर अडचणीही येतात. त्यामुळे निर्णय घेण्यापूर्वी भावनिक परिपक्वता, आर्थिक नियोजन, मूल्यांची जुळवाजुळव आणि संवादाची क्षमता यांचा विचार केला पाहिजे.

विवाह टिकत नाहीत, यासाठी केवळ महिलांना दोष देणे चुकीचे आहे. स्त्रियांच्या अपेक्षा वाढल्या असतील, तर त्यामागे त्यांच्या शिक्षणामुळे, स्वावलंबनामुळे आणि आत्मसन्मानाच्या जाणीवेमुळे आलेल्या सकारात्मक बदलांचाही विचार केला पाहिजे. अन्याय, असमानता किंवा अपमान सहन न करण्याची भूमिका ही अवास्तव अपेक्षा नसून सन्मानपूर्ण जीवनाची गरज असू शकते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्याचा अर्थ जबाबदारीशून्य वर्तन असा नसून, स्वतःच्या आणि जोडीदाराच्या अधिकारांचा आदर करत निर्णय घेणे असा आहे.

विवाह टिकवण्यासाठी दोघांनीही स्वतःला विचारले पाहिजे. आपण एकमेकांचे मालक आहोत की सहप्रवासी? आपल्या नात्यात भीती अधिक आहे की विश्वास? आपण एकमेकांना बदलण्याचा प्रयत्न करतो आहोत की समजून घेण्याचा? आपल्या मतभेदांमध्ये संवाद आहे की अपमान? विवाह टिकतो तो केवळ सामाजिक दबावामुळे नव्हे; तो टिकतो प्रेम, आदर, विश्वास, समानता आणि सततच्या प्रयत्नांमुळे. आणि जेव्हा हे सर्व संपते, तेव्हा विवाह टिकला तरी नाते जिवंत राहत नाही. म्हणून प्रश्न असा नसावा की मुलींच्या अपेक्षा किती वाढल्या आहेत किंवा सोशल मीडियामुळे महिला नैतिकता विसरत आहेत का. प्रश्न असा असावा.

स्त्री-पुरुष दोघांनीही स्वातंत्र्य, प्रेम, नैतिकता आणि जबाबदारी यांचा समतोल साधून अधिक सन्मानपूर्ण सहजीवन कसे निर्माण करायचे. विवाह टिकवणे ही केवळ स्त्रीची जबाबदारी नाही; ती दोघांची समान जबाबदारी आहे. नैतिकता ही स्त्रीवर लादलेली बंधने नसून, दोघांनीही प्रामाणिकपणे पाळायची मूल्यव्यवस्था आहे.

# तुजविण शंभो मज कोण तारी



शशिकांत तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ

'भस्म उटी रुंडमाळा,
हाती त्रिशूल नेत्री ज्वाळा'

या ओळीतून भगवान शंकराचे भयंकर पण,करुणामय रूपाचे वर्णन संत नरहरी सोनार महाराजांनी केले आहे. हे रूप जगातील नश्वरतेचे व मृत्यूच्या पलीकडच्या सत्याचे प्रतीक मानले जाते.

'भुते वेताळ नाचती,
हषुर्युक्त उमापती'

अशा वर्णनाने शंकराच्या भोवतालची विराट शक्ती दर्शनाविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या आसपास भुत, प्रेत, वेताळ इत्यादी नाचत असतात .हे सर्व अघोरीतत्त्वाचे प्रतीक आहेत. यावरून कळते की,भगवान शंकर हे सर्वांना स्वीकृत करणारे देव आहेत. तपस्वी, जनावरे, भूत, प्रेत देव, दानव हे घोर अघोर तत्वे त्यांच्या सानिध्यात समानच आहेत. त्यांचे हे रूप जरी भयंकर असले तरी, त्यांच्या अंतःकरणात करुणा आणि आनंद आहे. ते भक्तांना आशीर्वाद देण्यास सदैव तत्परच असतात.

याशिवाय, भगवान शंकराच्या भोळ्या रूपाचे वर्णनही भक्त कायम करतात.

'शिव भोळा चक्रवर्ती,
त्याचे पाय माझे चित्ती,
वाचे वदता शिवनाम,
तया न बाधी क्रोध काम'

वारकरी संताच्या परंपरेत शांतीब्रह्म म्हणून ओळखल्या जाणारे; संत एकनाथांनी शिवनाम व शिव स्वरूपाचा महिमा गायला आहे. त्यांच्या अभंग रचनेनुसार, भगवान शिव हे अत्यंत भोळे व संपूर्ण विश्वाचे राजे अर्थात चक्रवर्ती आहेत. अशा भोळ्या कृपा सागराचे चरण माझ्या चित्तात मी धारण केले आहे,आणि जो कोणी आपल्या वाचेने सतत शिवनामाचा जप अथवा स्मरण करतो. त्याला वासना आणि क्रोधासारख्या षड् विकारांची बाधा होत नाही.

'धर्म अर्थ काम मोक्ष,
शिव देखता प्रत्यक्ष'

मानवी जीवनात चार प्रमुख पुरुषार्थ मानले जातात.ते म्हणजे धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष ते प्रत्यक्ष शिवाचे दर्शन घेतल्याने किंवा त्याच्या कृपेने प्राप्त होतात. ही चार पुरुषार्थ म्हणजे भारतीय संस्कृतीतील मानवी जीवनाचे चार मूल्य होय.

त्यापैकी पहिला पुरुषार्थ 'धर्म' म्हणजे, मानवाचे कर्तव्य, नैतिकता आणि सत्याचा मार्ग म्हणजे धर्म होय. जी समाजाची आधारशीला आहे. दुसरा पुरुषार्थ 'अर्थ' होय. जीवन जगण्यासाठी आणि प्रपंचातील जबाबदारी पूर्ण करण्यासाठी संपत्ती मिळविणे; अर्थात आर्थिक सुरक्षितता मिळवणे म्हणजेच अर्थ होय. तिसरा पुरुषार्थ 'काम' मनातील इच्छा, प्रेम,कला- सौंदर्यातील आनंद व सुखाचा अनुभव घेणे म्हणजे काम होय. आणि चौथा व शेवटचा पुरुषार्थ 'मोक्ष' होय. मोक्ष हा मानवी जीवाचा अंतिम व सर्वोच्च उद्देश आहे. हे चारही पुरुषार्थ साध्य करण्यासाठी, मानवाने होतील तेवढे पूर्ण सायास करायला हवेत.दैवावर विसंबून न राहता पुरुषार्थावर विसंबून राहावे. कारण पुरुषार्थ आपल्या हाती असतात, दैव नाही! हाच संतांचा उपदेश आहे.या चार पुरुषार्थांविना मानवी जीवनात समानता साधता येत नाही.



'एका जनार्दनी शिव,
निवारी कळीकाळाचा
भेव'

संत एकनाथ आपले परम गुरू जनार्दन स्वामींच्या चरणाचे स्मरण करीत म्हणतात की,हा शिव कळीकाळ (कलियुगातील) भय देखील पूर्णपणे नष्ट करतो. शिवनाम व शिव तत्वाच्या स्मरणात अनन्यभावे शरणाने संतांनी घेतलेला अनुभव शिवभक्त व शिव साधकांना होतच राहील.

- ९१३०८३५४५८

# विज्ञान युगात बौद्धिक अक्षम (मतिमंद) मुलांचा सर्वांगीण विकास: धोरणात्मक बदल आणि संस्थात्मक सुधारणांची गरज

पंकज पांडे
रामटेक

विज्ञान युग आणि विशेष शिक्षणाचे महत्त्वआजचे जग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे जग आहे. सामान्य मुलांप्रमाणेच बौद्धिक अक्षम (मतिमंद) प्रवगार्तील मुलांचा शैक्षणिक दर्जा वाढवणे ही काळाची गरज आहे. ही प्रगती केवळ 'विशेष शिक्षण' आणि 'विशेष शाळांमधूनच' प्रभावीपणे होऊ शकते, कारण या मुलांच्या गरजा अत्यंत विशिष्ट आणि वैयक्तिक असतात.आज गरज केवळ पुस्तकी ज्ञानाची नाही, तर या मुलांना अउ्छ दैनंदिन जीवन कौशल्ये), समावेशित शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून समाजात 'आत्मनिर्भर' बनवण्याची आहे.सध्याची स्थिती आणि उणिवाशासनाकडून विशेष शाळांना वेतन, संकीर्ण अनुदान आणि परिपोषण अनुदान दिले जाते. परंतु, आजच्या आधुनिक काळातही अनेक संस्था ज्या गतीने आणि ज्या पातळीवर काम करायला हवे, तिथे कमी पडत आहेत. केवळ अनुदान देणे पुरेसे नाही; तर त्या अनुदानाचा वापर आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्य निर्मितीसाठी कसा होतोय, याचे पुनरुत्लोकन करणे गरजेचे आहे.या पार्श्वभूमीवर, जागतिक पातळीवर आपल्या राज्यातील दिव्यांग मुलांचा विकास घडवण्यासाठी शासनाने खालील धोरणात्मक निर्णय आणि सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे.

१. धोरणात्मक निर्णय आणि कायदेशीर बदल कौशल्यधिष्ठित अभ्यासक्रम बौद्धिक अक्षम मुलांसाठी पारंपरिक प्राथमिक शिक्षणापेक्षा 'कौशल्य विकास' आणि 'व्यवसायिक प्रशिक्षण' यावर आधारित विशेष अभ्यासक्रम तयार करावा.

**ADL (दैनंदिन जीवन कौशल्ये)चे प्रमाणीकरण :** प्रत्येक विशेष शाळेत मुलांच्या बुद्ध्यांकानुसार दैनंदिन व्यवहार कौशल्ये (स्वतःचे काम स्वतः करणे, पैशांचे व्यवहार, सामाजिक वर्तन) शिकवणे अनिवार्य करावे व त्याचे मूल्यमापन व्हावे.

**आजीवन साहाय्य व पुनर्वसन धोरणः** ही मुले १८ वर्षांची झाल्यानंतर त्यांच्या रोजगारासाठी आणि सुरक्षिततेसाठी शासनाने 'आजीवन साहाय्य केंद्र' किंवा 'संरक्षित कार्यशाळा' उभारण्याचे धोरण स्वीकारावे.

**२. विशेष शाळांचे सशक्तीकरण आणि पायाभूत सुधारणा डिजिटल आणि स्मार्ट विशेष शाळाः** विज्ञान युगाचा फायदा या मुलांना होण्यासाठी प्रत्येक विशेष शाळेत 'मल्टी-सेंसरी रूम', 'ऑगमेंटेड रियालिटी' आणि विशेष शैक्षणिक सॉफ्टवेअर उपलब्ध करून द्यावेत.

**परिपोषण व संकीर्ण अनुदानात वाढः** सध्याचे परिपोषण अनुदान महागाईच्या



काळात अपुरे आहे. डिजिटल साधने, थेरपिस्टची फी आणि आधुनिक साहित्यासाठी 'विशेष तांत्रिक अनुदान' मंजूर करावे.

**तज्ज्ञांची नियुक्ती :** केवळ शिक्षकांवर विसंबून न राहता, प्रत्येक शाळेत स्पीच थेरपिस्ट , ऑक्युपेशनल थेरपिस्ट आणि मानसोपचारतज्ज्ञ यांच्या नियुक्त्या शासनाने मानधनावर कराव्यात.

**३. समावेशित शिक्षण आणि सामाजिक स्वीकार्यताखऱ्या अर्थाने समावेशक समाजः** विशेष शाळेतील मुलांना मुख्य प्रवाहातील सामान्य मुलांसोबत जोडण्यासाठी क्रीडा, कला आणि सांस्कृतिक स्तरावर 'एकत्रित उपक्रम' राबवणे बंधनकारक करावे.

**कौशल्य वाढ आणि रोजगार हमीः** आयटीआय किंवा स्टार्टअप्सच्या माध्यमातून या मुलांच्या क्षमतेनुसार (उदा. पॅकेजिंग, बेकरी, बागकाम, डेटा एंट्री, हस्तकला) त्यांना रोजगार देणाऱ्या उद्योगांना शासनाने कर सवलत द्यावी.

**४. उत्तरदायित्व आणि मूल्यमापन कामाचे मूल्यमापन :** शासकीय अनुदान घेणाऱ्या संस्था केवळ कागदोपत्री काम करत नाहीत ना, हे तपासण्यासाठी 'गुणवत्ता नियंत्रण समिती' स्थापन करावी. ज्या संस्था उत्तम काम करून मुलांना आत्मनिर्भर बनवत आहेत, त्यांना 'विशेष प्रोत्साहन भत्ता' द्यावा.

**शिक्षकांचे जागतिक दर्जाचे प्रशिक्षणः** विशेष शिक्षकांना जागतिक पातळीवरील आधुनिक अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी करार करावा.

निष्कर्ष आणि कळकळीची विनंतीविज्ञान युगात जर आपण या दिव्यांग मुलांना आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य कौशल्यांची जोड दिली नाही, तर ते समाजाच्या मुख्य प्रवाहातून मागे पडतील. संस्थांना केवळ आर्थिक साहाय्य देऊन शासनाची जबाबदारी संपत नाही, तर त्या साहाय्यातून 'आत्मनिर्भर नागरिक' घडत आहेत की नाही, यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. एक मुख्याध्यापक आणि विशेष शिक्षक म्हणून मला पूर्ण विश्वास आहे की, जर शासनाने या धोरणात्मक सुधारणांची अंमलबजावणी केली, तर महाराष्ट्रातील बौद्धिक अक्षम मुले जागतिक पातळीवर स्वतःचे अस्तित्व निर्माण करतील आणि परावलंबी न राहता ताठ मानेने जगू शकतील.

**मुख्याध्यापक**
**स्नेहसदन बौद्धिक अक्षम (मतिमंद ) मुला मुलींची विशेष अनिवासी /निवासी शाळा शितलवाडी ता. रामटेक जि. नागपूर मो. ९१७५११६६१२**

थोडक्यात

## लहान मुलांनी बांधली देशभक्तीची राखी, बाल जगतमध्ये रक्षाबंधन स्पर्धा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दीनदयाल शोध संस्थान, बाल जगत नागपूर सातत्याने लहान मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि विकासात्मक कार्याला भर देऊन संस्काराची शिदोरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उभारणी करण्याचं काम करीत आहे. आपले हिंदू सण, त्याचे महत्व आणि त्या मागची भूमिका आणि देश प्रेम या अनुषंगाने बाल जगतने राखी कार्यशाळा आणि स्पर्धा आयोजित केली होती या स्पर्धेला लहान मुलांनी वैविध्य पूर्ण राखी तयार केली होती. त्यात कल्पकतेने तयार केलेल्या राख्या लहान मुलांची दूरदृष्टी व रक्षाबंधन प्रेम हे त्यांच्या क्रिएटिव्हिटी मधून तयार झाले आहे. बाल जगतच्या राखी कार्यशाळेला ४० मुलांनी सहभाग घेतला त्यात चिरंजीव वयोगट ५ ते ९ या विभागात अविरत जोगी,सात्विक पाठक आणि नायशा गजभिये यांना अनुक्रमे प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक देण्यात आला आणि वयोगट १०ते १६अंतर्गत जान्हवी टिचकुले, ओवी पाठक, अक्षिता सारवे यांना अनुक्रमे प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांक देण्यात आला.

कार्यक्रमाला लक्ष्मी नगरच्या नगरसेविका वर्षा चौधरी आणि माजी उपजिल्हाधिकारी सुनील कोरडे यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला बालजगतचे अध्यक्ष अभिनंदन पळसापुरे प्रकल्प प्रमुख अनुजा परचुरे आणि सचिव संजय भाकरे यांच्यासह निता केकरे, जयंत जोशी ॲडव्होकेट आनंद परचुरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजिका माधवीताई जोशीराव यांच्यासह मंजिरी घाटे, विनंती पाठक, वैशाली कढव, निकिता लुटे उपस्थित होते.

# गणेशोत्सव मंडळांना एकाच ठिकाणी मिळणार सर्व परवानगी

### महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते 'एक खिडकी योजनेचे' लोकार्पण, मनपाचे 'एक खिडकी' ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्यासाठी मनपाद्वारे विविध पाऊल उचलण्यात येत आहेत. गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना घ्याव्या लागणाऱ्या विविध परवानगीसाठी होणारा त्रास कमी करण्याकरिता मनपाद्वारे गणेश मंडळांना सोयीस्कर अशी ऑनलाईन प्रणाली अंमलात आणली असून, या 'एक खिडकी योजनेच्या' ऑनलाईन पोर्टलचे लोकार्पण महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते व मनपा आयुक्त डॉ.विपीन यांच्या उपस्थितीत गुरुवारी (ता.२७) करण्यात आले. यावेळी सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त राजेश भगत,



निर्भय जैन, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, वृक्षसंवर्धन अमोल चौरपगार, महावितरणचे अधिक्षक अभियंता प्रफुल्ल लांडे, मनपाचे आयटी अधिकारी स्वप्नील लोखंडे यांच्यासह मनपाचे कार्यकारी अभियंता, झोनल स्वच्छता अधिकारी, पोलीस दलाचे अधिकारी व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या काळात मंडळांना मंडप उभारणी, अग्निशमन सुरक्षा, वीज व्यवस्था तसेच इतर संबंधित बाबींसाठी विविध विभागांकडून आवश्यक परवानगी आणि ना हरकत प्रमाणपत्र घ्यावी लागतात. या प्रक्रियेसाठी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना विविध कार्यालयांमध्ये जावे लागू नये आणि एकाच ठिकाणी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता यावा, या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे गणेशोत्सव मंडळांसाठी परवानगी मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि नागरिकाभिमुख होणार असून, वेळ व श्रमाची बचत होण्यास मदत होणार आहे.

विविध विभागांच्या परवानग्यांसाठी एकाच ठिकाणी सुविधा 'एक खिडकी योजना' ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून गणेशोत्सव मंडळांना आवश्यक परवानगी व ना हरकत प्रमाणपत्रांसाठी ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन सादर करता येणार असल्याने संबंधित मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष कार्यालयात वारंवार जाण्याची आवश्यकता कमी होणार आहे. ऑनलाइन प्रक्रियेमुळे अर्ज सादर करण्यापासून परवानगी प्रक्रियेपर्यंतची कार्यवाही अधिक सुलभ व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यास मदत होणार आहे. नागरिकांना आपल्या अर्जाच्या परवानगीची सद्यस्थिती सम्बंधित माहिती बघता येणार आहे. विशेषतः गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने येणाऱ्या परवानगी अर्जांचे व्यवस्थापन करण्यासाठीही ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

झोनमध्ये सुद्धा करता येणार अर्ज भरणा 'एक खिडकी योजना' अंतर्गत पोट्र्लसह शहरातील दहा झोनमध्ये देखील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी राहणार आहे, ज्यामुळे झोन कार्यालयात एकाच ठिकाणी गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांना परवानगी अर्ज भरण्याची सुविधा करण्यात आली आहे. इच्छुक मंडळ झोन कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरणा करू शकतात. यामुळे प्रत्यक्ष अर्ज भरतांना विविध विभागाच्या पर्वांगीकरिता विविध कार्यालयात जाण्याची गरज पडणार नाही आणि कामे सुलभ होईल.

घरबसल्या करता येणार अर्ज या पोर्टलची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांना घरबसल्या ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. आवश्यक कागदपत्रे व संबंधित माहिती ऑनलाइन सादर करून परवानगी प्रक्रियेसाठी अर्ज करता येईल. गणेश मंडळांना नागपूर महानगरपालिकेच्या ऑनलाइन सेवा पोर्टलवर जाऊन आवश्यक माहिती भरून परवानगीसाठी अर्ज करता येणार आहे.

## महापौरांनी केली मनपा शाळेची आकस्मिक पाहणी

### शिक्षण व्यवस्था, मूलभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या स्थितीचा आढावा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांनी गुरुवारी (ता.२७) रोजी महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या पारडी परिसरातील बालवाडी आणि प्राथमिक शाळांना आकस्मिक भेट देत तेथील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. या आकस्मिक पाहणीचा मुख्य उद्देश शाळांमधील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृहे, वर्गखोल्यांची व्यवस्था, शिक्षकांची उपस्थिती आणि शैक्षणिक वातावरणाचा प्रत्यक्ष आढावा घेणे होता. या पाहणीवेळी, शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी दीपक लढ्ढा, अतिरिक्त आयुक्त अंकित, शिक्षण अधिकारी अमित भदाने तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी शाळेच्या परिसराची पाहणी करण्याबरोबरच शिक्षकांशी संवाद साधला तसेच विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांच्या गरजा आणि अडचणी जाणून घेतल्या. शाळांमधील उपलब्ध सुविधांचा आढावा घेताना ज्या ठिकाणी सुधारणा आवश्यक आहेत, त्या बाबींचीही गांभीर्याने नोंद करण्यात आली.

यावेळी महापौरांनी सांगितले की, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हे प्राधान्य आहे. अशा आकस्मिक भेटींमुळे शाळांची वास्तविक परिस्थिती समोर येते आणि आवश्यक सुधारणा तातडीने करण्यासाठी प्रभावी पावले उचलता येतात. त्यांनी या शाळेत मुख्याध्यापकांची नियुक्ती तात्काळ करने तसेच शिक्षकांची रिक्त पदे भरण्याचे निर्देश मनपा आयुक्तांना दिले. शिक्षण सभापती यांनीही शाळांतील व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेत विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक सुविधांना प्राधान्य देण्याबाबत महापौर आणि अतिरिक्त आयुक्त यांना सूचना केल्या. नागपूर महानगरपालिकेचे उद्दिष्ट शहरातील प्रत्येक महानगरपालिका शाळा ही विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण, उत्तम सुविधा आणि उत्तम संस्काराचे केंद्र बनविणे हे आहे. त्याच दिशेने शाळांची नियमित पाहणी आणि आवश्यक सुधारणा करण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू राहणार आहे, असे लढ्ढा यांनी सांगितले.

## थकीत मालमत्ता कर धारकांची मालमत्ता जप्त, मनपाची मोठी कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने धडक मोहिम सुरू करण्यात आली आहे. शहरातील दहाही झोनमधील थकीत मालमत्ता कराच्या वसुलीच्या मोहिमेला सुरूवात झाली असून, नेहरूनगर झोनद्वारे मे. श्री गजानन सेलेब्रेशन लॉन यांनी थकीत कराची भरपाई न केल्याने आणि संबंधित विषयावर योग्य असे कारण न दिल्याने जंगम मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आली. तसेच गांधीबाग झोनद्वारे ५ मालमत्ताधारकांकडून ३ लाख २३ हजार रुपयांची वसुली व ६ मालमत्तांना जप्त करण्यात आले आहे. प्रत्येक झोनमध्ये थकीत मालमत्ता कर धारकांकडे मनपाचे कर संग्राहक जाऊन थकीत रकमेची वसुली करीत आहे. हनुमाननगर झोनद्वारे हॉटेल तायबा येथे जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. ही मोहीम येत्या ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. मनपातर्फे रू.१.५१ कोटी रकमेची वसुली गुरुवारी करण्यात आली.

महापौर निता ठाकरे यांच्या निर्देशानुसार व आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात व मोहिमेला सुरूवात झाली आहे. या मोहिमेचे नेतृत्व मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., आणि मिलिंद मेश्राम करीत असून, मोहिमेअंतर्गत १ हजार कोटी रुपये थकीत मालमत्ता कर वसूल



करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. मनपाच्या स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर तथा कर संकलन समिती सभापती सरिता कावरे यांनीही नागरिकांना थकीत मालमत्ता कर भरण्याचे आवाहन केले आहे.

मालमत्ता कर वसूली अभियानांतर्गत नेहरूनगर झोन अंतर्गत मे. श्री गजानन सेलेब्रेशन लॉनवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून, सदर मालमत्ताधारक (श्री. दिलीप नामदेवराव ढवळे, श्री. किशोर नामदेवराव ढवळे व श्री. अविनाश नामदेवराव ढवळे) यांच्याकडे मनपाचा एकूण ९०,३६,५८९/- रुपये इतका मालमत्ता कर थकीत आहे. वारंवार नोटीस देऊनही थकीत कराचा भरणा न केल्यामुळे सदर मालमत्ता जप्त करण्यात आली असून प्रवेशद्वारावर जप्ती अधिपत्र (जप्तीचे वॉरंट) चिकटवण्यात आले आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हनुमाननगर झोन अंतर्गत १० मालमत्तांवर कारवाई करण्यात आली. त्यात हॉटेल तायबा यांच्यावर थकीत असलेल्या १४,०२,३५९ रूपांच्या कर रक्कमेची भरणा न केल्यामुळे झॉनद्वारे १७,९४,००० रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. तसेच गुरुवारी १० लक्ष रुपयांचा धनादेश झॉनद्वारे जप्त करण्यात आला आहे.

गांधीबाग झोन अंतर्गत ११ मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली, यातील पाच मालमत्ता धारकांनी थकीत मालमत्ता कराची भरणा केली. थकीत मालमत्ता कर वसुली मोहिमेच्या अनुषंगाने गांधीबाग झोनने एका दिवसात ३,२३,००० रु. धनादेशाद्वारे वसुली केली आहे. तसेच उर्वरित ६ मालमत्तांना जप्त करण्यात आले आहे यात श्री. यशवंत पुंडलिक तेली, श्रीमती मसुदा बेगम ह/ड श्री.असद खान, श्री.अब्बूमिया खान, श्री.जाफरउल्लाखा, श्री.नदीम अहमद खाँ विलायतुल्ला खाँ यांची घर जप्त करण्यात आली असून भीमदल आखाडा विरुद्ध सुद्धा जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

**व्यावसायिक मालमत्तांना प्राधान्य**

मालमत्ता कर वसूलीमध्ये व्यावसायिक मालमत्तांना व मोठ्या थकबाकी दारकांना प्राधान्य देऊन मोठ्या थकबाकीदारांकडून कर वसुली करण्याच्या सूचना मा. महापौर यांनी दिल्या आहेत. त्यानुसार संबंधित झोनमधील अधिकारी व कर वसुली पथकांकडून मोठ्या थकबाकी असलेल्या मालमत्तांची तपासणी करून नियमानुसार नोटीस, जप्ती व इतर आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

नागपूर महानगरपालिकेने सर्व मालमत्ताधारकांना आपला थकीत मालमत्ता कर त्वरित भरून महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. कर थकीत ठेवणाऱ्या मालमत्तांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असून, मालमत्ता कर वसूली अभियान यापुढेही अधिक तीव्रतेने राबविण्यात येणार आहे. प्रलंबित कराचा भरणा न करणाऱ्या संबंधित थकबाकीदारांबाबत महानगरपालिकेच्या नियमानुसार उपलब्ध असलेल्या सेवांवर आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतही सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही कारवाई होण्यापूर्वी आपला प्रलंबित कर तातडीने भरून महानगरपालिकेच्या कर वसुली मोहिमेस सहकार्य करावे. असे आवाहन महापौर यांनी केले आहे.

## EPTB व बालकांमधील क्षयरोग विषयावरील CME कार्यक्रम संपन्न

### सार्वजनिक शासकीय व खाजगी समन्वयातून क्षयरोग निर्मूलनाला बळ देण्याचे आवाहन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत भारताला क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. क्षयरोगाचे केवळ फुफ्फुसीय स्वरूपच नव्हे, तर Extrapulmonary Tuberculosis (EPTB) तसेच बालकांमधील क्षयरोग यांचे वेळेवर निदान, योग्य उपचार आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा अत्यंत महत्त्वाचा आहे. याच अनुषंगाने HLFPPT (SSHAKTI Project) यांच्या वतीने City TB Office, महानगरपालिका नागपूर आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांच्या सहकार्याने EPTB व Paediatric Tuberculosis या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन २१ ऑगस्ट २०२६ रोजी हॉटेल तुली इम्पीरियल, रामदासपेठ, नागपूर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूरच्या Tuberculosis & Respiratory MediciQe विभागाच्या प्रमुख डॉ. राधा मुंजे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूरच्या Tuberculosis & Respiratory MediciQe विभागाचे प्रमुख डॉ. सुशांत मेश्राम, इंडियन मेडिकल असोसिएशन नागपूरचे अध्यक्ष डॉ. सचिन गाठे, IGGMC नागपूरचे उप-अधिष्ठाता डॉ. गोपाल अग्रवाल तसेच HLFPPT चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. किशोर रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची प्रास्ताविक भूमिका मनपाचे शहर क्षयरोग तज्ञ डॉ. शिल्पा जिचकार यांनी केली. तसेच दोन्ही म्हणजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर येथील आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सदाफ खातिब आणि डॉ. विनय माहेश्वरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मनपा नागपूरचे समन्व्यक संगीता शिंगणे यांनी केले.

## धंतोली परिसरातील वाहतूकीस अडथळा निर्माण होणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमण महापालिकेची व पोलीस विभागाची धडक कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोन तसेच लक्ष्मीनगर झोन अंतर्गत धंतोली परिसरातील वाहतूकीस निर्माण होणाऱ्या रस्त्यावरील अळथळे निर्माण करणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमणे करणाऱ्यांविरुद्ध दिनांक २७ ऑगस्ट रोजी मोठ्या प्रमाणात संयुक्त अतिक्रमण कारवाई करण्यात आली.



सदर कारवाई आयुक्त, नागपूर महानगरपालिका, पोलीस आयुक्त तसेच पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान धंतोली परिसरातील रस्ते, दवाखाने व रुग्णालयांच्या आजूबाजूचा रस्ते मोकळे करून परिसर मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त केले आहे. महानगरपालिकेच्या वतीने नागरिक, व्यावसायिक, दुकानदार तसेच आस्थापना चालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या परिसरात रस्त्यावर अथवा सार्वजनिक रस्त्याच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये.

यापुढे रहदारीच्या रस्त्यावर अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांचे साहित्य जप्त करून अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच लागू असलेल्या कायदेशीर तरतुदीनुसार संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाहीदेखील करण्यात येईल. धंतोली परिसरातील रस्ते व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी ही कारवाई निरंतर सुरू राहणार असून नागरिकांनी महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन, सहा. आयुक्त, धरमपेठ झोन व लक्ष्मीनगर झोन यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, मोफत वर्ग सुरू करण्याचा संस्थेचा संकल्प

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सम्राट प्रसेनजित सामाजिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूरद्वारा संचालित लहुजी विद्यार्थी संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम श्री साई सभागृह, शंकरनगर चौक येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिक्षण, स्पर्धा परीक्षा व करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संस्थे च्यावतीने दुर्लक्षित



व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी JEE व NEET अॅिल्लीॅ चे मोफत वर्ग सुरू करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

ही संस्था निशुल्क कोचींग देते तसेच बर्डी परिसरातील संस्थेच्या अकादमीत इंग्लिश स्पीकिंग, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा व पोलीस भरतीचे मोफत वर्ग सुरू असल्याची माहिती देण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक व अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिनभाऊ साठे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. खठव दिल्लीचे प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड व डॉ. आशिष तायवाडे यांनी उच्च शिक्षण, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती व करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. उद्योजक संजय सोनटक्के यांनी डॉ. सुरज लोखंडे यांच्या MDS व Oral Surgery च्या पुढील शिक्षणासाठी २ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुचेता कांबळे उपस्थितीत होत्या. मुख्य संयोजक प्रभाकरजी शिंदेसह, यावेळी न्यायाधीश सुधीर वानखेडे, उद्योजक संजय सोनटक्के, गजानन सनेसर, प्रशांत अवसरे, प्रवीण ढोके व पोलीस निरीक्षक महादेव खंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा तसेच दहावी- बारावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. किरणकुमार मनुरे, इंजि रविन्द्र खांडेकर, राजू वानखेडे, राजू खडसे, सोहम ठाकरे, सुभाष साळवे, शेखर गवळी, प्रशांत वानखेडे, प्रकाश लोखंडे, आकाश सेश्वर, विनोद बावणे रिंकू शनेश्वर इत्यादी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन सौ. कविता ताकतोडे तर प्रास्ताविक प्रभाकर शिंदे यांनी केले व आभार सचिन तेलंगे यांनी मानले.

थोडक्यात

## वाडीत दिवसाढवळ्या घरफोडी, लाखोंचा ऐवज लंपास

### हरिओम सोसायटीत चोरट्यांचा धुमाकूळ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

पोलिसांना न जुमानता चोरट्यांनी वाडीत पुन्हा एकदा धुमाकूळ घातल्याचे दिसून येत आहे. हरिओम सोसायटी परिसरातील एका बंद



घराला दिवसाढवळ्या लक्ष्य करून अज्ञात चोरट्यांनी मागील दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. घरातील लाखो रुपयांची रोकड तसेच सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, हरिओम सोसायटीतील प्लॉट क्रमांक १४४ येथे प्रकाश रहागडाले हे आपल्या कुटुंबीयांसह वास्तव्यास आहेत. कुटुंबातील एका सदस्याच्या तेरवीच्या कार्यक्रमासाठी रहागडाले कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी गुरुवारी दुपारी सुमारे तीन वाजताच्या सुमारास घराच्या मागील दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला.

चोरट्यांनी घरातील कपाटे व साहित्याची उचकापाचक करून लाखो रुपयांची रोकड आणि सोन्या-चांदीचे दागिने असा मोठा ऐवज लंपास केल्याचे समजते. व्यावसायिक प्लॉट खरेदीसाठी मोठी रक्कम रहागडाले यांनी घरात आणून ठेवली होती, अशी माहिती असून ही बाब चोरट्यांना आधीपासून माहीत होती का, याबाबतही पोलिसांकडून तपास केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच वाडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घराची पाहणी करून पंचनामा केला असून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच संशयित व्यक्तींच्या हालचालींची माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे.

**दिवसा घरफोडी झाल्याने नागरिकांमध्ये संताप**

वाडीत दिवसाढवळ्या घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बंद घरे हेरून चोरी करणाऱ्या टोळ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी तसेच परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दिवसाढवळ्या झालेल्या या धाडसी चोरीमुळे नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे.

## गट ग्रामपंचायत भांडेवाडी येथे रक्षाबंधन

### ग्रामपंचायत भांडेवाडी अंतर्गत येणाऱ्या गावातील महिलांनी अरोली नवनियुक्त ठाणेदार मंगेश गोमासे यांना बांधल्या राख्या



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

गट ग्रामपंचायत भांडेवाडी येथे शुक्रवार (ता.२८ ऑगस्ट) ला रक्षाबंधनाच्या कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून अरोली पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित ठाणेदार सागर गोमासे यांना सरपंच मंगला विष्णु देशमुख, सदस्य व ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या भांडेवाडी सावंगी शिवाडौली या तीनही गावातील अंगणवाडी सेविका, गावातील महिलांनी त्यांना शाल, श्रीफळ व राखी बांधून रक्षाबंधनच्या कार्यक्रम साजरा केला. याप्रसंगी ठाणेदार सागर गोमासे यांनी महिलांना सुरक्षा बाबत तसेच मोबाईल पासून होणारे दुष्परिणाम यावर मार्गदर्शन केले आणि आश्वासन दिले की ,कोणतेही समस्या तुमच्यावर आली तर तुमच्या भाऊ सागर गोमासे तुमच्या पाठीशी उभा आहे. कोणतीही समस्या माझ्यापर्यंत पोचली नाही, तरी महिला सरपंच असल्यामुळे ती समस्या तुम्ही सरपंचांना कळवा, त्या मला फोन करतील आणि तुमची समस्या सोडवायला मी लगेच आल्याशिवाय राहणार नाही. मी एवढा शब्द तुम्हाला याप्रसंगी राखीची भेट म्हणून देत आहे .

याप्रसंगी पोलीस अधिकारी श्याम सातपुते, अरोली पंचायत समिती गणातील भाजप नेते विष्णू देशमुख,पोलीस पाटील अरुण वाघाडे, ग्रामपंचायत सदस्य अनिता बानणगडे, खोमेश्वरी नागफासे , अंजिरा राऊत, ललिता मरसकोल्हे, सुमित मात्रे, कल्पना सलामे, सविता उईके, निर्मला काळसर्पे, शितल मोहुर्ले, इंदिरा कोलते, रेखा धुर्वे, ललिता परतेती, पुष्पा मंडाळी, निशा मंडाळी, मंदा वाडीभस्मे, शिला मात्रे, रंगु गेडाम,नेहा वरठी, शशिकला वाढवे, प्रमिला सलाम, दीपिका गेडाम ,दर्शना शेंडे, ललिता वाढवे, सुनीता वाढवे, कमला वाढवे, बबीता शेंडे, बबीता टेकाम, सुनिता वाढवे सह गावातील असंख्य महिला, मुली व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इलाईट पब्लिक स्कूल चाचेर येथे रक्षाबंधन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

इलाईट पब्लिक स्कूल चाचेर येथे येथे रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. रक्षा बहुउद्देशीय शिक्षण संस्थांचे अध्यक्ष राष्ट्रपाल गजभिये यांचा मार्गदर्शनाखाली रक्षाबंधनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामधे लहान मुलाना राखी चे महत्व समजावुन सांगण्यात आले. मुलींनी घरून राखी बनवून आणली. मुलींनी मुलांना राखी बांधल्यानंतर मुलांनी मुलींना भेटवस्तू म्हणून चॉकलेट दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकवृंद शबनम शेख, आचल वाणी, भारती नारनवरे, संतोषी बरबते, नेहा पाल, निकिता कावरे यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेसकडून राहुल गांधींना महाराष्ट्रात 'रिलाँचिंग' करण्याचा प्रयत्न

### आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करून, आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करून काँग्रेसकडून राहुल गांधींचे महाराष्ट्रातील 'रिलाँचिंग' करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीका करत हा प्रकार काँग्रेसने तातडीने थांबवावा, असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर राज्य सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक निर्णय घेतले आहेत. तसेच मागण्यांबाबत लिखित आश्वासनही दिले आहे. त्यामुळे प्रश्न सुटण्याच्या मार्गावर असतानाही आंदोलन सुरू ठेवण्याचा हट्ट कशासाठी, असा सवाल चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केला.

बावनकुळे म्हणाले, राज्य सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा केली असून गरज पडल्यास वारंवार त्यांच्याशी संवाद साधण्याचीही सरकारची तयारी आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्याची आमची भूमिका आहे.



मात्र, प्रश्न सुटण्याच्या दिशेने मार्गक्रमण सुरू असतानाही आंदोलन सुरू ठेवण्याचा हट्ट का केला जात आहे?

विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधी यांच्या पुढील महाराष्ट्र दौऱ्यापर्यंत आंदोलन पेटते ठेवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोपही बावनकुळे यानी केला. हा प्रकार आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्यासारखा आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांचा वापर राजकीय हेतूसाठी करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि शैक्षणिक संधी वाढविण्यासाठी संवेदनशीलतेने काम करत असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य घडविणे हा सरकारचा उद्देश आहे. मात्र, काँग्रेसला विद्यार्थ्यांच्या करिअरपेक्षा आपल्या नेत्यांचे राजकीय करिअर वाचविण्याची अधिक चिंता असल्याचे या आंदोलनाच्या निमित्ताने स्पष्ट होत आहे, असा आरोप त्यांनी केला. आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत काँग्रेसला खरोखरच आस्था असेल, तर विद्यार्थ्यांना राजकीय आंदोलनाचे साधन बनविण्याऐवजी काँग्रेसने सरकारसोबत संवाद साधावा, असे आवाहनही बावनकुळे यांनी केले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका. आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवू नका. राहुल गांधी यांच्या राजकीय पुनरागमनासाठी आदिवासी विद्यार्थ्यांचा वापर करणे महाराष्ट्र कदापि स्वीकारणार नाही, असा इशारा बावनकुळे यांनी दिला.

## माहूरकर बाबा शास्त्री यांच्या पासष्ठीपूर्ती सोहळ्याचे आयोजन रविवारी




### महापौर नीता ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महानुभाव पंथातील थोर ज्ञानवंत माहूर पीठाचे कवीश्वराचार्य गुरुवर्य महंत श्री माहूरकर बाबा शास्त्री यांच्या पासष्ठीपूर्ती निमित्त अभिष्टचिंतन व सत्कार सोहळ्याचे आयोजन रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता. कविवर्य सुरेश भट सभागृह, नागपूर येथे करण्यात आले आहे.

अभिष्टचिंतन आयोजन समिती आणि नागपूर जिल्हा महानुभाव परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री देवदेवेश्वर श्री दत्त मंदिर, माहूरचे संचालक कवीश्वराचार्य महंत श्री माहूरकर बाबा शास्त्री यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. घोटी (नाशिक) येथील महानुभाव आश्रमाचे संचालक उपाध्य कुलभूषण आचार्य श्री पूजेदकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. सोहळ्याचे उद्घाटन उपाध्य कुलाचार्य महंत श्री वर्धनश्य बिडकर बाबा यांच्या शुभहस्ते होणार असून, अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष कवीश्वर कुलाचार्य महंत श्री कारंजेकर बाबा अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर महानगरपालिकेच्या महापौर मा. नीताताई ठाकरे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी अजिंठा निवासी आचार्य प्रवर महंत श्री रिद्धपुरकर बाबा शास्त्री आणि रिद्धपूर निवासी आचार्य प्रवर महंत श्री गोपीराज बाबा शास्त्री यांच्या शुभहस्ते विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

व्रतस्थ स्मरणिकेचे प्रकाशन माहूरकर बाबा शास्त्री यांनी अशोकांची व रुग्ण संतजनांची सेवा, मंदिर जीर्णोद्धार, ग्रंथ प्रकाशन यांसह विविध सामाजिक व धार्मिक कार्यांत योगदान दिले आहे. ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आयुष्य वेचणारे, निष्कलंक चारित्र्य आणि दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा गौरव केला जातो. त्यांच्या कायार्चा गौरव करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या व्रतस्थ या गौरवपर स्मरणिकेचे विमोचन फलटण निवासी कवीश्वर कुलाचार्य महंत श्री विद्रांस बाबा यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक व चिंतनशील आचार्य श्री बाबुळगावकर बाबा शास्त्री यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून आचार्य श्री न्यायव्यास बाबा शास्त्री उपस्थित राहणार आहेत. तसेच स्वागताध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्याच्या नगररचना विभागाचे माजी संचालक श्री एन. आर. शेळे यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतून ज्ञानसंपन्न संत-महंत, महानुभाव पंथाचे अनुयायी तसेच मान्यवर या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. असे पत्रकार परिषदेमध्ये पुरुषोत्तम ठाकरे यांनी पत्रकारांना सांगितले. यावेळी तुषारराव ढगे, आनंदराव गजभिये, गोविंदराव ठाकरे, आणि लालचंदजी वंजारी यांची उपस्थिती होती.

## सोमनाळा येथे आशा कार्यकर्त्यांसाठी दिव्यांग संवेदनशीलता कार्यशाळा



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा यांच्या वतीने समुदाय आधारित दिव्यांग व्यक्ती पुनर्वसन प्रकल्पांतर्गत (सीबीआर) सोमनाळा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आशा कार्यकर्त्यांसाठी दिव्यांग जाणीव-जागृती व संवेदनशीलता कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत दिव्यांग व्यक्तींची गावपातळीवर ओळख करून त्यांना आवश्यक आरोग्य सेवा, दिव्यांग प्रमाणपत्र, यूडीआयडी कार्ड व विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रितम नानवटे, मनोज पिसुड्डे, डॉ. केवल कोरडे व डॉ. योगेश बोडखे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आशा कार्यकर्त्यांनी गावातील पात्र दिव्यांग व्यक्तींची ओळख करून त्यांना आवश्यक सेवा व योजनांशी जोडण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## चाचेर येथे आज मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

बायोमास बँक आयोजित आणि रोटरी क्लब नागपूर डाउनटाउन यांच्या सहकार्याने उद्या शनिवार (ता. २९ ऑगस्ट) ला सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत चाचेर तर्फे सर्व गावकऱ्यांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे करण्यात आले आहे.

शिबिरामध्ये अनुभवी डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी,रक्तदाब, मधुमेह आणि सर्वसाधारण तपासणी, महिला व बालकांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन, आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. शिबिरात येताना आधार कार्ड आणि जुने रिपोर्ट सोबत आणायचे आहेत.

तरी गावातील सर्व लहान, थोर, महिला, पुरुष आणि जेष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन शिबिराचा लाभ घेण्याचे आव्हान चाचेर ग्रामपंचायत सरपंच लुंबिनी महेश कलारे सह समस्त ग्रामपंचायत सदस्य गणांनी केले आहे.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे नागपूर जिल्ह्यात कृषी क्रांती!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ग्रामीण महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला नवा आर्थिक आणि तांत्रिक बळकटपणा देण्यासाठी महावितरणच्या माध्यमातून राज्य शासनाने हाती घेतलेली 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' नागपूर जिल्ह्यात खऱ्या अर्थाने क्रांती घडवून आणत आहे. या अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि दूरदर्शी योजनेमुळे जिल्ह्यातील ७,१४८ शेतकऱ्यांना आता सिंचनासाठी रात्री-अपरात्रीच्या कष्टापासून व धोक्यापासून पूर्णपणे मुक्त होत दिवसा अखंडित, खात्रीशीर आणि भरवशाचा वीज पुरवठा मिळू लागला आहे.

या योजने अंतर्गत महावितरणच्या नागपूर ग्रामीण मंडलांतर्गत येणाऱ्या काटोल तालुक्यातील ३३/११ केव्ही येनवा उपकेंद्रावरील येरला धोटे येथे ४ मेगावॅट आणि ३ मेगावॅट क्षमतेचे अत्याधुनिक सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आले आहेत. या प्रकल्पाची उभारणी मेसर्स एमकेएफ सोलर लिमिटेडने केली आहे. या प्रकल्पामुळे येनवा उपकेंद्रावरील येनवा, गोंडीदिग्रस, खामली, मोखेडी, कळंभा, खांडला, सिंगारखेडा, येरला धोटे, गोंही, चिखली, डोरली, इसापूर खुर्द आणि इसापूर बुद्रुक या गावांतील सुमारे २,०१४ कृषी ग्राहकांच्या शेतीला दिवसा सिंचनासाठी वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे.

या येरला धोटे प्रकल्पापूर्वी नागपूर जिल्ह्यात कचारी सावंगा येथे ४ मेगावॅट क्षमतेचा, तोंडाखैरी येथे ३ मेगावॅट क्षमतेचा तर सावरगाव येथे ८ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीपणे कार्यरत झाले आहेत. या पाचही प्रकल्पांच्या माध्यमातून आतापर्यंत नागपूर जिल्ह्यात



एकूण २२ मेगावॅट वीज निर्मिती क्षमता प्रत्यक्षात उभी राहिल्याने जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या शेतीला दिवसा वीज मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

यापूर्वी ग्रामीण भागात शेतकऱ्यांना सिंचनासाठी पारंपरिक पद्धतीने बहुतांश वेळा रात्रीच्या सुमारास वीज पुरवठा केला जात असे. यामुळे शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री अंधारात शेतात जाणे, विषारी साप, विंचू दंश किंवा हिंस्त्र प्राण्यांच्या भीतीखाली जीव मुठीत धरून काम करणे भाग पडत असे. मात्र, सावरगाव, कचारी सावंगा, तोंडाखैरी आणि येरला धोटे येथील सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे तेथील शेतकऱ्यांना या सर्व त्रासातून कायमची मुक्ती मिळाली आहे. आता दिवसा नियमित वीज उपलब्ध होत असल्यामुळे शेतकरी दिवसा पिकांचे सिंचन करीत आहेत, तसेच खते व पाण्याचे योग्य व अचूक नियोजन करणे त्यांना शक्य झाले आहे.

शासनाच्या या सर्वसमावेशक सौरऊर्जा धोरणामुळे ग्रामीण भागाच्या एकूणच आर्थिक व कृषी विकासाला मोठी गती मिळत आहे. शेतीसाठी मोठ्या प्रमाणात सौरऊर्जेचा वापर वाढल्यामुळे पारंपरिक ग्रीडवरील विजेचा ताण कमी होत आहे आणि मोठ्या प्रमाणावर पर्यावरणपूरक हरित ऊर्जेची निर्मिती होत आहे. तसेच, स्थानिक पातळीवर सौर प्रकल्पांमधून वीज निर्मिती होत असल्यामुळे वीज पारेषण व वितरण दरम्यान होणारे तांत्रिक नुकसान मोठ्या प्रमाणावर कमी झाले असून, वीज पुरवठ्याची विश्वासार्हता आणि गुणवत्ता वाढली आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात शाश्वत क्रांती घडवून आणण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी संकल्पनेतून आकाराला आलेली 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' आज ग्रामीण महाराष्ट्रासाठी एक वरदान ठरत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिल्यामुळे पिकांचे ऐन वेळेवर होणारे नुकसान टळणार आहे आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होणार आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार आगामी मार्च २०२७ च्या अखेरपर्यंत राज्यातील कृषी सिंचनासाठी लागणारा शंभर टक्के वीज पुरवठा केवळ सौरऊर्जेद्वारेच उपलब्ध करून देण्याचे एक महत्त्वाकांक्षी नियोजन राज्य शासनाने केले आहे.

या संपूर्ण मोहिमेला आणि राज्य सरकारच्या धोरणाला ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे. या पार्श्वभूमीवर, महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक, नागपूर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे आणि नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीची कामे अत्यंत वेगाने प्रगतीपथावर आहेत.

थोडक्यात

## श्रावणाच्या पावन पर्वावर आमगावात रंगला 'सावन झुला' उत्सव

### समस्त लोधी समाज महिला मंडळाचा उत्स्फूर्त पुढाकार; विविध मनोरंजनात्मक उपक्रमांनी महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

श्रावण मासाच्या पावन पर्वानिमित्त समस्त लोधी समाज महिला मंडळाच्यावतीने सावन झुला कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी आमगाव येथील साई लॉन, सालेकसा रोड येथे उत्साहात करण्यात आले. श्रावणातील पारंपरिक संस्कृती आणि महिलांच्या सहभागाचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात वीरांगना राणी अवंतीबाई लोधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी महिलांनी मोठ्या उत्साहाने विविध मनोरंजनात्मक खेळांमध्ये सहभाग घेतला. कार्यक्रमात श्रावणातील पारंपरिक गीते, झुला झुलणे, महिलांचे नृत्य तसेच विविध सांस्कृतिक व मनोरंजक उपक्रम घेण्यात आले. हिरव्या रंगाच्या साडीचा ड्रेस कोड असल्याने कार्यक्रमस्थळी हिरव्या साड्यांतील महिलांची आकर्षक उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली.

या निमित्ताने समाजातील महिला भगिनींना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी मिळाली. तसेच अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे महिलांमध्ये सामाजिक एकोपा, परस्पर स्नेह आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन होण्यास मदत होत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सावन झुला कार्यक्रम समितीचे प्रभा उपराडे, गायत्री गराडे, सरिता नवगोडे शोभा मच्छीरके, प्रिया गयगये, पुष्पा नवगोडे, स्कंधा लिल्हारे, ममता बसोने, मीना मोहारे, लता ढेकवार, वंदना लिल्हारे, कौशल्या बसोने, प्रीति लिल्हारे, मानकुंवर बनोठे, रक्षा माहुले, लक्षवंती, ममता, खुशबू, प्रीति, सरस्वती, पूजा यानी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला समाजातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या संयोजक सुखवंता बनोठे यांनी संचालन करून उपस्थित सर्व महिला भगिनींचे आभार मानले. त्यांच्या पुढाकारातून आयोजित झालेल्या या सावन झुला उत्सवामुळे आमगावात श्रावणाच्या पारंपरिक आनंदाला विशेष रंगत आली.

## नागपूर जिल्ह्यातील दोन ग्रामपंचायतींची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राज्यस्तरीय मूल्यांकनासाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील कोतवालबडी, ता. काटोल आणि धानला, ता. मौदा या दोन ग्रामपंचायतींनी विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत नागपूर विभागातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. या दोन्ही ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय मूल्यांकनासाठी निवड झाली आहे. ग्रामविकास व पंचायती राज विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मूल्यांकनासाठी समिती गठीत करण्यात आली असून या दोन्ही ग्रामपंचायतींची प्रत्यक्ष पाहणी या समितीचे पथक करणार आहे. दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी हे पथक प्रत्यक्ष पाहणी करेल.

ग्रामपंचायतींनी अभियानांतर्गत केलेली कामगिरी, उपलब्ध अभिलेख व कागदपत्रे, पोर्टलवर भरलेली माहिती, संबंधित पुरावे तसेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामांची पाहणी हे पथक करेल. राज्यस्तरीय समितीमध्ये ग्राम विकास व पंचायत राज विभागातील वरिष्ठ अधिकारी, राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा), पंचायत राज विभाग, ग्रामीण जीवनोन्नती अभियान तसेच ग्रामपंचायत स्तरावरील प्रतिनिधींचा समावेश आहे.

नागपूर जिल्ह्यातील कोतवालबडी आणि धानला या दोन्ही ग्रामपंचायतींची विभागीय स्तरावरून राज्यस्तरीय मूल्यांकनासाठी झालेली निवड ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून, या माध्यमातून नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या उल्लेखनीय कामगिरीला राज्यस्तरावर अधोरेखित करण्याची संधी मिळणार आहे.

राज्यस्तरीय मूल्यांकन प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद नागपूर, संबंधित पंचायत समित्या, गट विकास अधिकारी तसेच दोन्ही ग्रामपंचायतींच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ते समन्वय व नियोजन करण्यात आले आहे. मूल्यांकन पथकास आवश्यक अभिलेख, कागदपत्रे, पोर्टलवरील माहिती व संबंधित पुरावे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील या दोन्ही ग्रामपंचायतींच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपिल कलोडे व प्रशासनाने ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी आणि ग्रामस्थांचे अभिनंदन केले.

# रक्षाबंधन के पावन पर्व पर जामसांवली में आकर्षक सजावट

### महिला श्रद्धालुओं ने हनुमान की चरण पादुकाओं को राखी बांध सौंपा रक्षा का दायित्व, सेल्फी पॉइंट बना आकर्षण का केंद्र

**दै. सिंहवाणी वृत्त, सौंसर**

भाई,बहन के अटूट प्रेमए विश्वास और रक्षा के पवित्र बंधन के पर्व रक्षाबंधन के अवसर पर चमत्कारिक श्री हनुमान मंदिर जाम सांवली धाम में विशेष रूप से राखी थीम पर आकर्षक एवं मनमोहक सजावट की गई। मंदिर परिसर और भगवान श्री हनुमान का दिव्य एवं आकर्षक श्रृंगार श्रद्धालुओं के लिए विशेष आकर्षण का केंद्र रहा।





इस अवसर पर बड़ी संख्या में पहुंची महिला श्रद्धालुओं ने भगवान श्री हनुमान जी की चरण पादुकाओं को प्रतिकात्मक राखी बांधकर अपनी रक्षा का दायित्व हनुमान दादा को सौंपा तथा सुख.समृद्धि एवं परिवार की खुशहाली की कामना की। श्रद्धा और भक्ति से ओतप्रोत इस अनूठे दृश्य ने मंदिर परिसर के वातावरण को और अधिक भक्तिमय बना दिया।

रक्षाबंधन केवल भाई,बहन के प्रेम का पर्व ही नहींए बल्कि सनातन संस्कृति में प्रेमए विश्वासए कर्तव्य और रक्षा के संकल्प का प्रतीक भी है। यह पावन पर्व हमें रिश्तों की मयार्दा और एक.दूसरे की सुरक्षा व सम्मान के प्रति अपने दायित्वों का स्मरण कराता है। मंदिर में राखी थीम पर की गई सजावट ने सनातन संस्कृति और भारतीय परंपराओं का सुंदर संदेश प्रस्तुत किया।

**रक्षाबंधन सेल्फी पॉइंट ने बढ़ाया आकर्षण**

श्रद्धालुओं के उत्साह को देखते हुए मंदिर परिसर में रक्षाबंधन विशेष सेल्फी पॉइंट भी तैयार किया गया था। यहां श्रद्धालुओं ने उत्साहपूर्वक सेल्फी और तस्वीरें लेकर इस धार्मिक आयोजन की यादों को संजोया तथा सोशल मीडिया के माध्यम से मंदिर की ख्याति और इस अनूठी पहल को दूर.दूर तक पहुंचाया। सेल्फी पॉइंट विशेष रूप से युवाओं और महिलाओं के बीच आकर्षण का केंद्र बना रहा।

मंदिर संस्थान अध्यक्ष गोपाल शर्मा ने बताया कि हिंदू धर्म के प्रमुख त्योहारों पर भगवान एवं मंदिर की विशेष और आकर्षक सज्जा की जाती है। वहीं राष्ट्रीय पर्व १५ अगस्त एवं २६ जनवरी के अवसर पर भी मंदिर में देशभक्ति आधारित विशेष सजावट की जाती है। उन्होंने बताया कि मंदिर की इस अभिनव पहल और विशेष साज.सज्जा को श्रद्धालुओं से भरपूर सराहना मिल रही है।

रक्षाबंधन के अवसर पर भक्तिए आस्था और सनातन संस्कृति के रंगों से सजा चमत्कारिक श्री हनुमान मंदिर जामसांवली धाम बश्रद्धालुओं के लिए आकर्षण और आस्था का केंद्र बना रहा।

## राज्यमंत्र्यांच्या अंगरक्षकाविरोधात लैंगिक शोषणाची पोलिसांत तक्रार

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

अर्थ व नियोजन तसेच कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या अंगरक्षकाने लग्न करण्याचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याची तक्रार महिलेकडून प्राप्त होताच रामटेक पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याने फोटो व व्हिडिओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे तसेच एका महिलेचे नाव देखील तिने तक्रारीत नमूद केले आहे. विशेष म्हणजे, पीडितेने अंगरक्षकाच्या पत्नीला सोबत घेऊन ही तक्रार दाखल केली. त्याला अद्याप अटक केलेली नाही.

अजय सदाशिव सलामे (३८, रा. छोरिया लेआउट, रामटेक) असे आरोपीचे नाव असून, तो सध्या राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचा अंगरक्षक असून, यांचा अंगरक्षक होता. पीडित महिला ही भगतसिंग वॉर्ड, रामटेक येथील रहिवासी असून, या प्रकरणातील सहआरोपी महिला ही रामटेक शहरातील अठराभुजा मंदिराजवळ राहते. अजयने लग्नाचे आश्वासन देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्याचे दुसऱ्या प्रेमसंबंध आमच्यामध्ये निर्माण झाला. महिलेशी जुळल्याने दुरावा

**रामटेक ठाण्यात गुन्हा दाखल : तक्रारीत एका महिलेच्या नावाचा उल्लेख**

आपण बोलणे बंद केल्याने त्याने फोटो व व्हिडिओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी दिली. एवढेच नव्हे तर त्याच्या संपर्कात असलेल्या महिलेने माझे माज्या मुलांचे नुकसान करण्याची धमकी दिली, असेही तिने तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी रामटेक पोलिसांनी अजय सलामे व एका महिलेच्या विरोधात भारतीय न्यायसंहिता (बीएनएस) कलम ६९, ३५१ (२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल संपूर्ण आरोपांची पडताळणी केली जाणार असून, आरोपींना अद्याप अटक केलेली नाही, असे पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या घटनेचा सहायक पोलिस निरीक्षक स्वाती यावले व राजकुमार अग्निशस्त्राचा धाक दाखवायचा.

अजयच्या पत्नीने त्याच्या विरोधात पोलिसांत तक्रार केली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली. पीडितेला न्याय मिळावा म्हणून अजयच्या पत्नीने पीडितेला सोबत घेऊन पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांची भेट घेऊन त्यांना घडलेला संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर दोघींनी रामटेक येथील उपविभागीय पोलिस अधिकारी, रामटेक रमेश बरकते यांची भेट घेतली. अजय अंगरक्षक असल्याने त्याच्याकडे अग्निशस्त्र असते. तो नेहमीच त्या शस्त्राचा धाक दाखवतो, असा आरोप त्याच्या पत्नीने केला आहे.

## हजारोंच्या संख्येत बहिणींनी घेतला मोफत प्रवासाचा लाभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाद्वारे महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात व परिवहन समिती सभापती मंगला खेकरे यांच्या संकल्पनेनुसार शुक्रवार (ता.२८) रोजी स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत रक्षाबंधनाच्या दिवशी 'आपली बस' मधून प्रवास करणाऱ्या महिला आणि १० वर्षांखालील मुलांना मोफत प्रवासाचा लाभ देण्यात आला, हजारोंच्या संख्येत महिलांनी या उपक्रमाला प्रतिसाद दिला असून, शुक्रवार दुपारी चार वाजेपर्यंत जवळपास वीस हजार महिला व बालक प्रवाश्यांनी प्रवास केला.

## जटामखोरा येथे कडक पोलीस बंदोबस्तात संयुक्त मोजमाप सुरू

### एमआयडीसी प्रकल्पासाठी सावनेर तालुक्यातील नऊ गावांच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग, शेतकऱ्यांचे आंदोलन सुरूच

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पासाठी सावनेर तालुक्यातील नऊ गावांच्या भूसंपादन प्रक्रियेदरम्यान, जटामखोरा गावात संयुक्त मोजमाप अहवालासाठी (जेएमआर) जमिनीचे मोजमाप करण्यात आले. शेतकऱ्यांच्या संभाव्य आंदोलनाची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने मोजमाप स्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. महसूल, भूमी अभिलेख, वन, सार्वजनिक बांधकाम आणि कृषी विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मिळालेल्या माहितीनुसार, एमआयडीसी प्रकल्पासाठी सावनेर तालुक्यातील नऊ गावांमध्ये जमीन संपादित केली जात आहे. अनेक शेतकरी या भूसंपादन प्रक्रियेला आधीच तीव्र विरोध करत आहेत. तथापि, काही शेतकऱ्यांनी आपली जमीन देण्यास सहमती दर्शवली आहे. तथापि, सहकारी शेतकऱ्यांच्या विरोधामुळे, सहमत असलेले अनेक शेतकरी उघडपणे पुढे येणे टाळत आहेत.

**कडक पोलीस बंदोबस्तात मोजणी पार पडली**

जटामखोरा येथील जेएमआर मोजणीदरम्यान सावनरचे उपविभागीय अधिकारी आणि भूसंपादन अधिकारी यांचे प्रशासकीय कर्मचारी तैनात करण्यात आले होते. भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक आणि त्यांच्या पथकाने मोजणी प्रक्रियेत सहभाग घेतला. महसूल विभागाचे उपतहसीलदार आणि



पटवारी, वन विभागाचे कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी आणि कृषी विभागाचे कर्मचारी देखील घटनास्थळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांकडून संभाव्य विरोधाची शक्यता लक्षात घेता, केळवद पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. कडक पोलीस बंदोबस्तात भूमोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

**शेतकऱ्यांचा विरोध आणि संभ्रम**

एमआयडीसी प्रकल्पासाठी होणाऱ्या भूसंपादनाबाबत परिसरातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष कायम आहे. काही शेतकरी प्रशासनाला संमती देत आहेत, तर काही जण भूसंपादनाला विरोध करत आहेत. अशा परिस्थितीत, संमती देणारे शेतकरीसुद्धा संभ्रमात आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की जमीन ही त्यांच्यासाठी केवळ मालमत्ता नसून, त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहे. त्यामुळे, भूसंपादनापूर्वी शेतकऱ्यांचे आक्षेप, मागण्या आणि नुकसान भरपाईच्या मुद्द्यांवर स्पष्टता असणे आवश्यक आहे.

**सोशल मीडियाद्वारे एकजूट**

सावनर तालुक्यातील नऊ गावांतील शेतकऱ्यांनी भूसंपादनाच्या विरोधात सोशल मीडियाद्वारे एकत्र येण्याचा प्रयत्न केला आहे. सोशल मीडियावर संदेश आणि माहिती शेअर करून, ते इतर शेतकऱ्यांना त्यांच्या परिस्थितीबद्दल माहिती देत आहेत आणि भूसंपादनाविरोधात सामूहिक आवाज उठवत आहेत.

**प्रशासनाने प्रक्रियेला गती दिली आहे**

प्रशासनाने भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात जमीन मालकांना नोटिसा बजावल्या आहेत. या नोटिसांमध्ये जमिनीचा औद्योगिक क्षेत्र म्हणून विकास आणि भूसंपादन प्रक्रियेचा उल्लेख आहे. याव्यतिरिक्त, संबंधित व्यक्तींना त्यांची मते मांडण्याची आणि वैयक्तिक सुनावणीला उपस्थित राहण्याची संधी देण्यात आली आहे.

जटामखोरा येथे कडेकोट पोलीस बंदोबस्तात पार पडलेल्या जेएमआर मोजणीनंतर, भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नऊ गावांतील शेतकऱ्यांचा विरोध आणि काहींनी प्रस्तावाला दिलेली संमती पाहता, एमआयडीसी प्रकल्पासाठीचे भूसंपादन हा येत्या काळात या भागातील एक मोठा मुद्दा बनण्याची शक्यता आहे.

## दिव्यांग भगिनींसोबत आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी साजरे केले रक्षाबंधन

### खुशी व नावीन्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येकी १ लाख रुपयांची एफ.डी. आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्यातर्फे फिजिओथेरपीचा खर्चही उचलला

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

बहीण-भावाच्या अतूट आणि पवित्र नात्याचा सण असलेल्या रक्षाबंधनानिमित्त सावनेर येथे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी मतदारसंघातील दिव्यांग भगिनींसोबत रक्षाबंधनाचा सण अत्यंत आपुलकीने आणि भावनिक वातावरणात साजरा केला. यावेळी दिव्यांग भगिनी खुशी आणि नावीन्या यांनी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांना राखी बांधून औक्षण केले. या प्रसंगी उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंदाचे आणि आपुलकीचे भाव पाहायला मिळाले.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने केवळ औपचारिक कार्यक्रम न करता आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी दिव्यांग भगिनींच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक परिस्थितीची आस्थेने विचारपूस केली. त्यांच्या घरातील परिस्थिती, दैनंदिन अडचणी, आरोग्य तसेच भविष्यातील गरजा याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली. दिव्यांग भगिनींना नियमितपणे आवश्यक असलेल्या फिजिओथेरपीचा खर्च स्वतः उचलण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

तसेच खुशी आणि नावीन्या यांच्या भविष्यासाठी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या वतीने प्रत्येकी एक लाख रुपयांची एफ.डी. करून देण्यात आली. भविष्यात त्यांच्या शिक्षणासाठी, स्वावलंबनासाठी आणि गरजेनुसार ही रक्कम उपयोगी पडावी, या उद्देशाने हा उपक्रम करण्यात आला. याशिवाय त्यांच्या कुटुंबाला घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.



दिव्यांग भगिनींना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा परिपूर्ण लाभ मिळावा, यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासनही आमदार डॉ. देशमुख यांनी दिले. त्यांच्या जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी आणि त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी बोलताना आमदार डॉ. आशिषराव देशमुख म्हणाले, रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नाही, तर बहिणीच्या आयुष्यभराच्या सुरक्षिततेची, सुखाची आणि सन्मानाची जबाबदारी स्वीकारण्याचा दिवस आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीला दिलेला शब्द हा मोठा असतो आणि हा शब्द आयुष्यभर निभावण्याचा माझा संकल्प आहे. दिव्यांग भगिनींच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद हेच या रक्षाबंधनाचे खरे समाधान असल्याचे सांगत, त्यांच्या सुख-दुःखात सदैव सहभागी राहून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भावना आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी व्यक्त केली.

या उपक्रमातून रक्षाबंधनाचा सण केवळ परंपरेपुरता मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि बहिणीच्या भविष्यासाठी जबाबदारी स्वीकारण्याचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.

## रक्षाबंधणाच्या दिवशी माळेगावावर शोककळा, सुमित बावणे यांचा हृदयविकाराने मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

रक्षाबंधणाचा आनंदाचा दिवस सुरू असतानाच माळेगाव येथे आज दुपारी १२ वाजताच्या सुमारास दुःखद घटना घडली. सुमित विठ्ठल



बावणे (वय ३०), व्यवसाय झ हातमजुरी, यांना अचानक छातीत दुखू लागल्याने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुमित यांची प्रकृती अचानक बिघडल्याची माहिती मिळताच सावनेर येथील सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या मदतीने त्यांना तातडीने सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. मृतदेह पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी विच्छेदनाकरिता रवाना करण्यात आला आहे.

सुमित यांच्या पश्चात आई, पत्नी आणि अवघ्या पाच वर्षांची मुलगी असा परिवार आहे. कुटुंबातील कर्ता आणि कमावता व्यक्ती अचानक निघून गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विशेष म्हणजे रक्षाबंधणाच्या पवित्र दिवशीच ही दुर्दैवी घटना घडल्याने माळेगाव गावावर शोककळा पसरली आहे. अवघ्या ३० व्या वर्षी सुमित यांचा अचानक मृत्यू झाल्याने गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहे.